मंगळवार
**१४**
एप्रिल २०२६

वर्ष १९ वे
अंक - ९०
पाने - १२
किंमत - ४ रूपये

- Web : www.yuvavarta.in/com
- Mail : dailyyuvavarta@gmail.com

# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25



# संपादकीय...

## आशा भोसले यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन

## स्वरांच्या पलीकडील आशाताई

महान कलाकारांच्या संदर्भात 'स्वर्गीय आवाज', 'अजरामर गायकी', 'अष्टपैलुत्व' अशा विशेषणांचा आपण सहज वापर करतो; पण काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की शब्दांची ही चौकटच अपुरी पडते. आशा भोसले हे असेच एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या जाण्याने केवळ एक गायिका हरपली नाही, तर अनेक पिढ्यांच्या भावविश्वाला आकार देणारा एक जिवंत स्वर शांत झाला आहे. मात्र, त्यांच्या गायकीने निर्माण केलेले संगीतविश्व आजही तितकेच जिवंत आणि स्पंदनशील आहे. आशाताईंनी आठ दशकांहून अधिक काळ भारतीय संगीत क्षेत्रात अखंड साधना केली. हिंदी, मराठीसह अनेक भाषांमध्ये त्यांनी हजारो गाणी गायली आणि प्रत्येक गाण्यातून त्यांनी वेगवेगळ्या भावनांना नवे आयाम दिले. त्यांच्या गायकीचे वैशिष्ट्य म्हणजे प्रयोगशीलता. परंपरेचा सन्मान राखत त्यांनी कधीही चौकटीत स्वतःला बंदिस्त ठेवले नाही. उलट, त्यांनी त्या चौकटी मोडून नव्या शैलीची निर्मिती केली. भारतीय आणि पाश्चात्त्य संगीताचा समन्वय साधत त्यांनी स्वतःचा स्वतंत्र आवाज घडवला, जो काळानुरूप बदलत गेला, पण कधीही फिका पडला नाही. त्यांच्या सुरुवातीच्या काळात चित्रपटसृष्टीत विशिष्ट प्रकारच्या आवाजांना अधिक मान्यता होती. लता मंगेशकर यांचा मधुर आणि नाजूक स्वर, तसेच गीता दत्त आणि शमशाद बेगम यांची पारंपरिक शैली प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत होती. अशा परिस्थितीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणे हे सोपे नव्हते. प्रारंभी काही वर्षे आशाताई त्या प्रवाहातच वाहताना दिसतात; परंतु त्यांनी स्वतःची मर्यादा ओळखली आणि वेगळा मार्ग स्वीकारला. त्यांनी आपल्या आवाजात धार, चैतन्य आणि खेळकरपणा आणला. याच बदलामुळे त्यांना वेगळी ओळख मिळू लागली. चित्रपटसृष्टीत होत असलेल्या बदलांसोबत आशाताईंनीही आपली शैली विकसित केली. जॅझ, पाश्चात्त्य लय, आधुनिक संगीतप्रवाह यांचा स्वीकार करून त्यांनी आपल्या गायकीला नवे रूप दिले. अवखळ, उत्साही आणि खट्याळ भावनांना त्यांनी आपल्या आवाजातून जिवंत केले. त्यामुळेच त्यांच्या आवाजात एक वेगळा ठसा निर्माण झाला. विविध संगीतकारांनी त्यांच्या या वैशिष्ट्याचा योग्य वापर केला आणि त्यांच्या कारकिर्दीला नवे उंचीवर नेले. त्यांच्या गायकीचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तिची व्यापकता. भक्तिगीते, भावगीते, लावण्या, लोकगीते, नाट्यगीते, चित्रपटगीते अशा सर्वच प्रकारांमध्ये त्यांनी आपली छाप उमटवली. बालगीतांपासून ते श्रृंगारिक गीतांपर्यंत आणि गंभीर भावनांपासून ते उत्साहपूर्ण गाण्यांपर्यंत प्रत्येक प्रकारात त्यांनी प्रावीण्य सिद्ध केले. त्यामुळेच त्यांच्या गायकीने प्रत्येक वयोगटातील श्रोत्यांच्या जीवनाला स्पर्श केला.मराठी माणसाच्या भावविश्वात आशाताईंच्या गाण्यांना विशेष स्थान आहे. बालपणातील निरागसता, तरुणपणातील स्वप्ने, जीवनातील आनंद आणि दुःख या सर्व भावना त्यांच्या गीतांमधून व्यक्त झाल्या. त्यांच्या आवाजाने मराठी संस्कृतीला एक वेगळे सौंदर्य प्राप्त झाले. त्यांच्या गायकीने केवळ मनोरंजन केले नाही, तर जीवन समृद्ध केले. लता मंगेशकर आणि आशा भोसले या दोन बहिणींची तुलना अनेकदा केली जाते. दोघींच्या गायकीत साम्य असले तरी त्यांची वैशिष्ट्ये वेगळी आहेत. लतादीदींचा स्वर शांत, नाजूक आणि आध्यात्मिकतेकडे झुकणारा होता, तर आशाताईंचा आवाज उत्साही, धारदार आणि जीवन्त होता. एकीकडे गोडवा आणि शालीनता, तर दुसरीकडे चैतन्य आणि प्रयोगशीलता-या दोन भिन्न प्रवाहांनी भारतीय संगीत अधिक समृद्ध केले. आशाताईंच्या गायकीत मानवी जीवनातील सर्व भावना प्रतिबिंबित होतात. प्रेम, आनंद, दुःख, खट्याळपणा, वेदना, उत्साह अशा प्रत्येक भावनेला त्यांनी आपल्या आवाजातून स्वर दिला. त्यामुळेच त्यांची गाणी केवळ ऐकण्यापुरती राहत नाहीत, तर ती जगण्याचा एक भाग बनतात. त्यांच्या गायकीत एक मानवी स्पर्श आहे, जो श्रोत्यांना आपलेसे वाटतो. आज आशाताई आपल्या सोबत नसल्या, तरी त्यांचा आवाज काळाच्या पलीकडे जाऊन अमर झाला आहे. त्यांच्या गाण्यांमधून त्या सदैव आपल्या सोबत राहतील. प्रत्येक पिढी त्यांच्याकडून काहीतरी नवीन शिकेल आणि त्यांच्या सुरांची परंपरा पुढे नेईल. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही; पण त्यांच्या स्वरांची संपन्नता आपल्याला नेहमी प्रेरणा देत राहील.

## शिक्षणमहर्षी विद्यालयात महात्मा फुले जयंतीनिमित्त अभिवादन



तळेगाव दिघे (युवावार्ता प्रतिनिधी)- संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे येथील शिक्षणमहर्षी गुलाबराव गोविंदराव जोंधळे माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयात थोर समाजसुधारक, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

तळेगाव दिघे येथील शिक्षणमहर्षी विद्यालयात आयोजित क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती निमित्ताने संगमनेर पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी कल्याण राऊत यांच्या हस्ते क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

प्रसंगी, प्राचार्य एच. आर. दिघे, उपमुख्याध्यापक संजय दिघे, पर्यवेक्षक बी. सी. दिघे, अभिजित आगलावे, ज्येष्ठ शिक्षक सुनील घुले, एकनाथ जोंधळे, दिलीप ताजने, बाबा जगताप, प्रभाकर जोरी, बी. एस. फटांगरे, मच्छिंद्र कासार, संजय डोंगरे, सुनील दिघे, निलेश भिडे, योगेश गांगुर्डे, राम गायकवाड, रविकिरण जोंधळे, महेश उगार, राकेश झनान, विकास शिंदे, भूषण जाधव, संजय आर. दिघे, युवराज गायकवाड, गोरख दिघे, आशा पन्हाळकर, अश्विनी कुऱ्हाडे, तुकाराम सोळसे, मच्छिंद्र सोनवणे, शालन उगले, सुनील थेटे, शोभा गुंजाळ, शितल कडलग, मच्छिंद्र सोळसे, अण्णासाहेब कोटकर, प्रमिला घायतडकर, धनश्री दिघे, अविनाश बिऱ्हाडे, संभाजी सुर्वे, भाऊसाहेब दिघे उपस्थित होते.

प्रसंगी, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यांनी क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. प्रास्ताविक सुनील दिघे यांनी केले. सूत्रसंचालन राम गायकवाड यांनी केले. बाबा जगताप यांनी आभार मानले.

## महात्मा फुले यांचा मानवतावादी विचार देशाला पुढे नेणारा – मा. आ. डॉ. तांबे



संगमनेर (प्रतिनिधी)- क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी सर्वप्रथम शेतकरी, शोषित, वंचित यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. बहुजनांच्या विकासाचा समतेचा व पुरोगामी विचार त्यांनी जगाला दिला असून, सर्व धर्म समभाव, बंधुता, समता जोपासणारा क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा मानवतावादी विचारच देशाला पुढे नेणारा असल्याचे प्रतिपादन जय हिंद लोकचळवळीचे संस्थापक मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांनी केले आहे.

माळीवाडा येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मा. आ. डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, दुर्गाताई तांबे, धनंजय डाके, सोमेश्वर दिवटे, अरुण हिरे, अभिजीत ढोले, नितीन अभंग, ड. निशा शिवूरकर, डॉ. नामदेव गुंजाळ, रजत अवसक, दत्ता ढगे, नगरपालिकेचे अमजद पठाण आदींसह पदाधिकारी व युवक कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मा. आ. डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, महात्मा ज्योतिबा फुले यांनी जगाला समतेचा विचार दिला. बहुजनांच्या विकासाचा विचार करून आयुष्यभर काम केले. उपेक्षित वर्गाला गुलामीच्या जोखडातून मुक्त करून स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळवून दिला. समाजाच्या कल्याणासाठी मानवतावादाचा विचार दिला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय लोकशाही व राज्यघटनेमध्ये सर्व समाज सुधारक, संत यांचे विचार आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांवर भारतीय राज्यघटना आहे. देश अधिक सामर्थ्यवान बनवण्यासाठी या राज्यघटनेतील या मूलभूत विचारांची देशाला गरज आहे. जातीभेद मिटवणे, वाद कमी करणे हे अत्यंत गरजेचे असून, महात्मा फुले यांचा मानवतावादाचा विचारच देशाला पुढे नेऊ शकतो, असे ते म्हणाले.

तर दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देत महात्मा ज्योतिबा फुले यांनी समतेचा पुरोगामी विचार देशाला दिला. अंधश्रद्धा निर्मूलन, सतीची चालबंदी, केशवपण बंदी यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. सामाजिक विषमता नष्ट करून समाजात समता निर्माण करण्याचे मोठे काम त्यांनी केले आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना पहिल्या शिक्षिका बनवून स्त्रियांच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले, त्यामुळेच आज विविध क्षेत्रांमध्ये महिला कार्यरत आहेत. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन संपर्क कार्यालय येथे ही क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सुरेश थोरात, प्रा. बाबा खरात, डॉ. नितीन भांड, रामदास तांबडे आदींसह संगमनेर मधील विविध कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
PARVEEN KHUDBUDDIN PATHAN
TO NEW NAME AS
PARVIN NADIM SHAIKH
ADD – KOLHEWADI ROAD, AT POST - SAMNAPUR, TAL - SANGAMNER, DIST - AHILYANAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
NADEEM MALANG SHAIKH
TO NEW NAME AS
NADIM MALANG SHAIKH
ADD – KOLHEWADI ROAD, AT POST - SAMNAPUR, TAL - SANGAMNER, DIST - AHILYANAGAR

**रॅक विकणे आहे**
सुपर शॉपी, किराणा दुकान, मेडिकल किंवा इतर दुकानांसाठी लागणाऱ्या रॅक आणि काउंटर विकणे आहे
(सर्व मटेरियल नवीन आहे फक्त दोन महिने वापर झाला)
9881855547

**पाहिजेत**
अनुभवी स्त्री/ पुरुष
सेल्समन व हेल्पर
संपर्क
कटारिया क्लॉथ सेंटर
पत्ता – मेन रोड, संगमनेर ४२२६०५
9595225428

WE ARE HIRING
JOIN OUR TEAM
CorelDRAW
Ps
Ai
Id
GRAPHIC DESIGNER


Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

**धन्वंतरी** मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
**पाहिजेत**
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची









MALPANI
卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)



## जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

**श्री साई मेस**
आमच्याकडे शुद्ध शाकाहारी घरगुती मेस आहे
शुद्ध शाकाहारी जेवण तयार करुन मिळेल संगमनेर
8530530656

**पाहिजेत**
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजेत
पत्ता – तीन बत्ती चौक, दिल्ली नाका, संगमनेर
9860989807
9422225947

**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी महिला पाहिजे
कॉम्प्युटर ऑपरेटर - २
हेल्पर - २
प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग – १ जागा
दुकानकामासाठी – ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
अकाउंटंट - ०२ जागा
टॅली कोर्स
ड्रायव्हर - ३ जागा
कॉम्प्युटर ऑपरेटर
संपर्क - डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड संगमनेर
9370071777
9822791484

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7030125701

**पाहिजेत**
शिलाई मशीन कामासाठी महिला - ०२
सेल्स एक्झिक्युटिव्ह - ०१
अमोल होम डेकोर मालदाड रोड, संगमनेर
8788483245
8698001007

**पाहिजेत**
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट – १ (महिला)
वेळ – सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
7498749500

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो-हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

खुशखबर... आपल्या मुला मुलींचे लग्न आमच्या प्रशस्त मंगल कार्यालयात करा
**साई मंगल लॉन्स**
थोड्याच तारखा शिल्लक
पत्ता– समनापुर, एच पी पेट्रोल पंप शेजारी
संपर्क– प्रताप गोडगे
9890924380

**वॉचमन पाहिजे**
बांधकाम साईट वर वॉचमन भरणे आहे
राहण्याची सोय आहे
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
संगमनेर शहरात ऑफिस कामाकरिता पदवीधर मुलगा पाहिजे
आकर्षक पगार
9881855547

**पाहिजेत**
मार्केटिंगसाठी मुलगा पाहिजे – ०२ जागा (गाडी व लायसन्स पाहिजे)
दुकानकामासाठी डिलीव्हरी बॉय पाहिजे – ०२ जागा
9766921306

**पाहिजेत**
अकाउंटंट - ०१ जागा (बी.कॉम/ एम.कॉम) टॅली प्राईम
मायक्रोबायोलॉजी - ०१
हेल्पर (मुले/मुली)- ०३
२ ते ३ वर्ष अनुभव
रास्पबेरी अॅग्रो बिझनेस प्रा.लि., गोडगे इंडस्ट्रीअल इस्टेट, संगमनेर एम.आय.डी.सी च्या बाजूला,वेल्हाळे रोड
9860284257
raspberryagrosales@gmail.com

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ऑसिस्टंट - १ (पुरूष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६



दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४



वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी




दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25




वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ९० । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार । १४/०४/२०२६ । पाने - १२




## तालुक्यात डॉ. आंबेडकर जयंती एकाचवेळी उत्साहात साजरी करा - पो. नि. साळुंखे



**महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती हा केवळ एक उत्सव नसून, सामाजिक एकतेचा आणि समतेचा संदेश देणारा राष्ट्रीय सण आहे. संगमनेर तालुका पोलीस ठाणे हद्दीत तीन ठिकाणी डॉ. आंबेडकर यांचे पुतळे असून, इतर ठिकाणी प्रतिमा पूजनाद्वारे जयंती साजरी केली जाते. यंदा सर्वांनी एकत्र येत सकाळी ८ वाजता पुतळा व प्रतिमा पूजन करून महामानवाला अभिवादन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमातून सामाजिक ऐक्याचे प्रेरणादायी दर्शन घडेल.**

**– प्रवीण साळुंखे, तालुका पोलीस निरीक्षक**

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर संगमनेर तालुका पोलीस प्रशासन सतर्क झाले असून, कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे. याच अनुषंगाने तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ३२ गावांतील कामगार पोलीस पाटील तसेच जयंती उत्सव आयोजकांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीत प्रत्येक गावात जयंती उत्सव शांततेत, शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी आवश्यक त्या सूचनांचे मार्गदर्शन करण्यात आले. उत्सवासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या वेळेत देण्यात येतील, तसेच गरजेनुसार पोलीस बंदोबस्तही उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन तालुका पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांनी दिले.

प्रारंभी, १४ एप्रिलनंतर कोणत्याही नव्या जयंती कार्यक्रमास परवानगी न देण्याची भूमिका पोलीस प्रशासनाने घेतली होती. मात्र, आयोजकांनी याला तीव्र विरोध दर्शवला. अनेक गावांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या संयुक्त जयंती साजऱ्या करण्याची परंपरा असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, १४ एप्रिल रोजी सर्वत्र आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करणे कठीण असल्याने, एकाच दिवशी सर्व कार्यक्रम घेणे शक्य नसल्याची वस्तुस्थितीही त्यांनी मांडली.

आयोजकांच्या या मागणीचा विचार करून अखेर पोलीस प्रशासनाने लवचिक भूमिका घेतली. आपल्या-आपल्या सोयीप्रमाणे जयंती उत्सवाचे नियोजन करून तो शांततेत आणि उत्साहात पार पाडावा, असे आवाहन पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांनी केले.

## उपचारातील हलगर्जीपणामुळे महिलेचा मृत्यू?

### पीडित पतीची तक्रार, चौकशीची मागणी

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- शहरातील डॉ. सोनांबेकर हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान झालेल्या कथित हलगर्जीपणामुळे पत्नीचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप करत एका पीडित पतीने पोलीस प्रशासनासह आरोग्य यंत्रणेकडे धाव घेतली आहे. यामुळे आधीच वादात असलेल्या संबंधित डॉक्टरांच्या अडचणीत आणखी भर पडली असून, या प्रकरणाने शहरातील वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

रोहीदास गणपत डोंगरे (रा. निमज, ता. संगमनेर) यांनी संगमनेर शहर पोलीस ठाणे, जिल्हा शासकीय रुग्णालय तसेच महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडे लेखी तक्रार दाखल करून सखोल चौकशीची मागणी केली आहे. या प्रकरणातील पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

तक्रारीनुसार, डोंगरे यांच्या पत्नी मिना डोंगरे यांना छातीत त्रास जाणवत असल्याने २८ जानेवारी २०२६ रोजी डॉ. सोनांबेकर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. डॉ. कोरडे यांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असताना, दाखल केल्याच दिवशी एन्जिओग्राफी करण्यात आली. त्यानंतर २४ तासांच्या आत हृदयातील ८० टक्के ब्लॉकेज असल्याचे सांगून तातडीने एन्जिओप्लास्टी करण्यात आली.

मात्र, उपचारानंतर रुग्णाची प्रकृती सुधारण्याऐवजी अधिकच खालावत गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. रुग्णाला सतत चक्कर येणे, उलट्यांचा त्रास होणे, असे गंभीर लक्षणे दिसत असतानाही डॉक्टरांनी योग्य ती दखल घेतली नाही, असा आरोप नातेवाईकांनी केला आहे.




याशिवाय, ३० जानेवारी रोजी सकाळी डॉक्टरांनी एमआरआय करण्याचे सांगितले असतानाही दुपारपर्यंत कोणतीही हालचाल झाली नाही. चौकशी केल्यावर दुसऱ्या रुग्णालयात गर्दी असल्याचे कारण देत विलंब करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. अखेर नातेवाईकांनी स्वतः रुग्णवाहिका बोलावून बाहेर एमआरआय करून घेतला. या विलंबामुळे रुग्णाची प्रकृती अधिकच गंभीर झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.


आयसीयूमधील परिस्थितीबाबतही गंभीर आरोप करण्यात आले असून, युरिन कॅथेटर निखळून बेड ओला झाला होता, तसेच उलट्यांनंतरही रुग्णाची स्वच्छता वेळेवर करण्यात आली नाही, असा संतापजनक अनुभव नातेवाईकांनी मांडला आहे.

या सर्व घटनाक्रमामुळे वैद्यकीय सेवांबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी डोंगरे यांनी केली आहे. तसेच, हॉस्पिटलमधील सीसीटीव्ही फुटेज जतन करण्यात यावे आणि उपचाराशी संबंधित सर्व कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत, अशी विनंतीही त्यांनी पोलिसांकडे केली आहे. सदर हॉस्पिटलविरुद्ध दोन तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्याचबरोबर नगरपालिकेने हॉस्पिटलचे अनधिकृत बांधकाम देखील तोडले आहे.

दरम्यान, या घटनेमुळे संगमनेरमधील आरोग्य यंत्रणा आणि खासगी रुग्णालयांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, पोलीस व आरोग्य विभाग या गंभीर तक्रारीवर काय कारवाई करतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## प्रत्येक तालुक्यास १२ हजार लिटर रॉकेल

अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)- युद्धामुळे देशात इंधन टंचाई जाणवत आहे. राज्य शासनाने गॅसच्या तुटवड्यावर मात करण्यासाठी रॉकेलचा पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यासाठी २ लाख १६ हजार रॉकेलचे नियतन मंजूर झाले आहे. प्रत्येक तालुक्याला १२ हजार लिटर, तर अकोले, संगमनेर, राहुरी, नगरला २४ हजार लिटर वाटपाचे नियोजित आहे.



प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेमुळे दहा वर्षांपूर्वीच जिल्हा रॉकेलमुक्त झाला आहे. रॉकेल विक्रेत्यांकडील यंत्रणाही नष्ट झाली. आता पुन्हा याच वितरकांमार्फत रॉकेल वितरणाचा निर्णय घेण्यात आला आहे. रॉकेल वितरकांच्या परवान्याचे नूतनीकरणाचे आव्हान प्रशासनासमोर निर्माण झाले आहे.

अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांना एलपीजीला पर्याय म्हणून प्रति कुटुंब तीन लिटर रॉकेल देण्याचा निर्णय घेतला. शिधापत्रिका किंवा शिधापत्रिकाधारक नसलेले लाभार्थ्यांना स्वस्त धान्य दुकानदार किंवा किरकोळ रॉकेल विक्रेत्यांकडून प्रति कुटुंब ३ लिटरप्रमाणे रॉकेल मिळणार आहे. रॉकेल मिळविण्यासाठी ग्रामपंचायत रहिवास दाखला सादर करावा लागणार आहे. स्थलांतरित मजुरांना केंद्र अथवा राज्य शासनाचे ओळखपत्र दाखवावे लागणार आहे. एखाद्या गावात रॉकेल विक्रेता उपलब्ध नसल्यास शेजारच्या परवानाधारक गावातून रॉकेल वाटप केले जाणार आहे. विक्रेत्यांना रॉकेल साठा व वितरणाच्या दैनंदिन नोंदी ठेवणे बंधनकारक आहे. रॉकेलची वाहतूक वाहनातून करावी लागणार आहे. जुन्नर (जि. पुणे) येथील शशी एजन्सी, तर जामखेड येथील दर्शन एजन्सीची रॉकेल वाहतुकीसाठी निवड करण्यात आली आहे.

अहिल्यानगर शहरासाठी १२ हजार, तर तालुक्यासाठीही १२ हजार रॉकेल वितरण केले जाणार आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठा तालुका असलेल्या संगमनेरला २४ हजार लिटर, राहुरी तालुक्याची शिधापत्रिकाधारकांची संख्याही जास्त आहे. अकोले तालुका आदिवासी असल्याने या ठिकाणी २४ हजार लिटर रॉकेल वाटप केले जाणार आहे.

अंत्योदय व प्राधान्य कुटुंबातील साडेसात लाख कुटुंबांना रॉकेलचा पुरवठ्यात प्राधान्य राहणार आहे. जिल्ह्यामध्ये रॉकेलचे दहा होलसेल विक्रेते, तर ४५ घाऊक विक्रेते आहेत. प्रशासनाच्या वतीने परवाने नूतनीकरणासाठी या विक्रेत्यांशी संपर्क साधण्यात आलेला आहे. जिल्ह्यातील वाहतूक दरानुसार पात्र लाभार्थ्यांना ६२ रुपये १० पैसे प्रति लिटर या दराने कमीत-कमी पुरवठा होणार आहे. वाहतुकीच्या अंतरानुसार रॉकेलचा दरात तफावत राहणार आहे.

## स्वरसम्राज्ञी आशा भोसले अनंतात विलीन

मुंबई (प्रतिनिधी)- प्रसिद्ध पार्श्वगायिका आशा भोसले यांचे पार्थिव त्यांच्या निवासस्थानाहून शिवाजी पार्क स्मशानभूमीकडे नेण्यात आले. त्याठिकाणी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अमिताभ बच्चन यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत आशा भोसले यांच्यावर शासकीय सन्मानाने अंत्यसंस्कार करण्यात आले. सकाळी त्यांचे पार्थिव अंत्यविधीसाठी मुंबईतील त्यांच्या निवासस्थानी, कासा ग्रांडे येथे ठेवण्यात आले होते. त्यापूर्वी, त्यांना तिरंग्यात गुंडाळून सलामी देण्यात आली. रविवारी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांचे निधन झाले होते. त्या ९२ वर्षांच्या होत्या. आशा भोसले यांनी आपल्या ८२ वर्षांच्या गायन कारकिर्दीत नऊ फिल्मफेअर पुरस्कारांसह १०० हून अधिक पुरस्कार जिंकले. त्यांना देशाचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.



आशा भोसले शास्त्रीय गायक दीनानाथ मंगेशकर यांच्या कन्या आणि लता मंगेशकर यांच्या धाकट्या बहीण होत्या. जेव्हा त्या फक्त ९ वर्षांच्या होत्या, तेव्हा त्यांच्या वडिलांचे निधन झाले. यामुळे लतादीदींप्रमाणे आशा यांनीही कमी वयातच गायनाची सुरुवात केली. आशा यांनी पहिले गाणे १० वर्षांच्या वयात गायले होते. आशा भोसले यांनी त्यांच्या कारकिर्दीत २० हून अधिक भाषांमध्ये १२,००० हून अधिक गाणी गायली. त्यांची 'इन आंखों की मस्ती', 'दम मारो दम', 'पिया तू अब तो आजा' आणि 'चुरा लिया है तुमने' ही गाणी आजही लोकप्रिय आहेत.

महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या बैठकीत आशा भोसले यांना आदरांजली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आशा भोसले यांना आदरांजली वाहण्यात आली. या बैठकीत त्यांच्या नावाने एक प्रतिष्ठान स्थापन करण्याचा निर्णयही घेण्यात आला.

आशा भोसले यांच्या निधनावर अमिताभ बच्चन म्हणाले, आम्हाला खूप दुःख झाले आहे. एका संपूर्ण युगाचा अंत झाला आहे. महान आणि प्रतिष्ठित आशा भोसले आता आपल्यात नाहीत.आम्हा सर्वांना खूप दुःख झाले आहे. त्यांनी आपल्या आवाजाने प्रत्येक गाण्यात जीव ओतला. त्या आपल्याला कायमच्या सोडून गेल्या आहेत, पण त्यांनी आपल्यामागे अजरामर गाण्यांचा खजिना ठेवला आहे. त्यांचे शरीर आता आपल्यात नसले तरी, त्यांचा आवाज आणि त्यांच्या आठवणी कायम जिवंत राहतील.












# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन



























# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन
























# कै. नानासाहेब मारूती नाईकवाडी यांना

## नानांच्या आठवणीतून प्रेरणेचा प्रवास




कै. नानासाहेब मारुती नाईकवाडी हे नाव घेताच डोळ्यांसमोर उभा राहतो तो एक साधा, सरळ, प्रेमळ आणि कर्तव्यनिष्ठ व्यक्तिमत्व. आज नाना आपल्यात नाहीत, ही जाणीव मनाला फार वेदना देणारी आहे. पण त्यांनी मागे ठेवलेल्या आठवणी, संस्कार आणि मार्गदर्शन हे आमच्यासाठी सदैव प्रेरणादायी राहतील. नाना म्हणजे आमच्या कुटुंबाचा आधारस्तंभ होते. त्यांच्या वागण्यात एक वेगळीच आपुलकीचं ऊब होती. प्रत्येकाशी प्रेमाने वागणे, अडचणीत धीर देणे आणि योग्य मार्ग दाखवणे हा त्यांचा स्वभावच होता. गावात, नात्यात आणि समाजात सर्वजण त्यांना नाना म्हणूनच ओळखत आणि तितक्याच प्रेमाने संबोधत.

माझ्यासाठी तर नाना हे केवळ काका नव्हते, तर एक मार्गदर्शक, गुरु आणि प्रेरणास्थान होते. माझ्यावर त्यांचे विशेष प्रेम होते. माझ्या प्रत्येक निर्णयामागे त्यांचा विचार, त्यांचे मार्गदर्शन आणि त्यांचा आशीर्वाद असायचा.


राजकारणात असो किंवा व्यवसाय त्यांनी मला वेळोवेळी योग्य दिशा दाखवली, मार्गदर्शन केले. कोणतेही काम प्रामाणिकपणे करा, लोकांशी नातं जपा आणि जमिनीशी जोडलेले राहा हा त्यांचा मोलाचा संदेश आजही माझ्या मनात कोरलेला आहे. आज मी जे काही आहे, त्यामागे नानांचे मार्गदर्शन आणि संस्कार मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांच्या शिकवणीमुळेच मला समाजकार्य, राजकारण आणि व्यवसाय या क्षेत्रात काम करण्याची प्रेरणा मिळाली व यशस्वी होता आले. त्यांनी दिलेली शिकवण ही माझ्यासाठी आयुष्यभराचे भांडवल आहे.

नानांचे आयुष्य म्हणजे एक आदर्श जीवन होते - साधेपणा, प्रामाणिकपणा आणि माणुसकी यांचा सुंदर संगम. त्यांनी प्रत्येक नातं जपलं, प्रत्येकाला आपलेपण दिलं आणि समाजात एक वेगळी ओळख निर्माण केली. त्यामुळेच आज त्यांचे आपल्यात नसणे म्हणजे आपले काहितरी हरवल्यासारखी भावना सर्वांची झाली आहे. त्यांच्या असण्याने अनेकांना प्रेरणा व उत्साह मिळत होता. यशाचा मार्ग सापडत होता. ज्यांना ज्यांना नाना यांचे मार्गदर्शन मिळाले त्यांना यशाचा मार्ग मिळाला असा परीस होता. परंतु काळापुढे कुणाचे काही चालत नाही हेच खरे. नानांच्या अकस्मित जाण्याने केवळ नाईकवाडी परिवारच पोरका झाला नाही तर त्यांचे अनेक मित्र, सहकारी विविध पक्षांचे कार्यकर्ते देखील त्यांच्या मार्गदर्शनाला मुकले आहे. आज नाना आपल्या सोबत नसले तरी त्यांची आठवण, त्यांचे विचार आणि त्यांनी दिलेली शिकवण सदैव आमच्यासोबत राहील. त्यांच्या आठवणी आमच्या हृदयात कायम जिवंत राहतील.

माझ्या काकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना, त्यांच्या मार्गावर चालण्याचा आणि त्यांच्या विचारांना पुढे नेण्याचा मी नक्कीच प्रयत्न करेन, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. काका, तुमची उणीव कधीच भरून निघणार नाही पण तुमच्या आठवणी आमच्या आयुष्याचा आधार राहतील.

भावपूर्ण श्रद्धांजली .

**– तुमचाच लाडका पुतण्या**
**अमोल बाळासाहेब नाईकवाडी**
**अध्यक्ष, अकोले तालुका युवक काँग्रेस**
**संचालक, नागराज उद्योग समूह, अकोले**



## ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



क्षणोक्षणी आमच्या मनी..आहे तुमची आठवण...
हीच आमच्या जीवनातील..अनमोल अशी साठवण...

## कै.नानासाहेब मारूती नाईकवाडी

यांना

भावपूर्ण
॥ श्रध्दांजली ॥

स्वर्गवास-०५/०४/२०२६

**दशक्रिया विधी**

**मंगळवार दिनांक १४/०४/२०२६ सकाळी ७.३० वाजता**

-शोकाकुल-

श्रीमती सविता नानासाहेब नाईकवाडी (पत्नी)
गं.भा.इंदुबाई निवृत्ती नाईकवाडी

श्री.बाळासाहेब मारूती नाईकवाडी (भाऊ)
श्री.अशोक निवृत्ती नाईकवाडी (भाऊ)
श्री.नंदकुमार निवृत्ती नाईकवाडी (भाऊ)
गं.भा.नंदा रमेश नाईकवाडी (भावजई)
कु.अनिकेत नानासाहेब नाईकवाडी (मुलगा)
श्री.श्रीकांत बाळासाहेब नाईकवाडी (पुतणे)
सौ.माया विक्रांत देशमुख (पुतणी)

श्री.सुरेश रामभाऊ नाईकवाडी (भाऊ)
श्री.सुनिल निवृत्ती नाईकवाडी (भाऊ)
गं.भा.मुक्ताबाई माधव नाईकवाडी (भावजई)
श्री.स्वप्नील नानासाहेब नाईकवाडी (मुलगा)
श्री.अमोल बाळासाहेब नाईकवाडी (पुतणे)
श्री.प्रदिप बाळासाहेब नाईकवाडी (पुतणे)
श्री.विक्रांत गणपत देशमुख (जावई)

नातवंडे-राजनंदिनी,राजवीर,युगवीर,रूद्रांश

**समस्त नाईकवाडी परिवार,आप्तेष्ट व नातेवाईक,समस्त ग्रामस्थ अकोले**

-ठिकाण-
**प्रवरातिरी,पाटील पानवठा**
ता.अकोले जि.अहिल्यानगर



प्रवचनसेवा- ह.भ.प.दिपक महाराज देशमुख (सुगाव बु।।)

# साश्रूनयनांनी भावपूर्ण श्रध्दांजली!

## नानांच्या जाण्याने कुटूंब पोरके झाले

अकोले तालुक्याच्या मातीत जन्मलेले, सर्वांच्या मनात आपलेपण जपणारे आणि नाना या नावाने सर्वत्र ओळखले जाणारे कै. नानासाहेब मारुती नाईकवाडी आज आपल्यात नाहीत, ही गोष्ट मनाला पटतच नाही. त्यांच्या निधनाने केवळ नाईकवाडी कुटुंबावरच नव्हे तर संपूर्ण अकोले तालुक्यावर आणि त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येक व्यक्तीवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

नाना म्हणजे साधेपणाचा, कष्टाळूपणाचा आणि माणुसकीचा जिवंत आदर्श होते. त्यांनी आयुष्यभर प्रामाणिकपणे काम करत आपल्या कुटुंबाचा आणि समाजाचा आधारस्तंभ म्हणून भूमिका बजावली. अकोले खरेदी-विक्री संघाचे संचालक म्हणून त्यांनी जबाबदारी पार पाडताना प्रामाणिकपणा आणि लोकसेवेचा आदर्श ठेवला. त्यांच्या कार्यामुळे अनेकांना दिशा मिळाली, आधार मिळाला.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक विलक्षण आपुलकी होती. कुणीही त्यांच्याकडे आले, की नाना त्याला आपल्या माणसासारखे वागवत. त्यांच्या बोलण्यात एक गोडवा होता, जो माणसाला जवळ ओढून घेत असे. म्हणूनच अकोले तालुक्यातील लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण त्यांना प्रेमाने नाना म्हणून हाक मारत असत. हे नाव केवळ संबोधन नव्हते, तर त्यांच्यावरील प्रेम, आदर आणि विश्वासाचे प्रतीक होते.

माझ्यासाठी तर नाना हे केवळ काका नव्हते, तर मार्गदर्शक होते. आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर त्यांनी मला योग्य दिशा दाखवली. मी मुंबईत राहत असलो, तरी नानांचे मार्गदर्शन मला नेहमीच मिळत राहिले. कोणतीही अडचण आली, की त्यांच्या शब्दांमध्ये एक ताकद असायची, जी मला पुढे जाण्याची प्रेरणा देत असे.

गावी अकोल्याला गेल्यावर नानांसोबत घालवलेले क्षण आजही डोळ्यांसमोर उभे राहतात. त्यांच्यासोबत केलेल्या गप्पा, त्यांनी सांगितलेल्या आठवणी, आणि प्रत्येक भेटीत मिळणारे प्रेम - हे सगळं आज आठवलं, की मन भरून येतं आणि डोळे नकळत पाणावतात. त्यांच्या सहवासात एक वेगळाच आनंद होता, जो शब्दांत मांडता येणार नाही.

नानांनी आपल्या कुटुंबालाही प्रेमाने एकत्र बांधून ठेवले. त्यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबावर मोठी जबाबदारी आली आहे. त्यांचे सुपुत्र स्वप्निल नानासाहेब नाईकवाडी आणि चिरंजीव अनिकेत नानासाहेब नाईकवाडी यांच्याकडे पाहताना नानांचीच छबी दिसते. नानांनी दिलेले संस्कार, मूल्ये आणि शिकवण हीच त्यांची खरी संपत्ती आहे. आज या दोघांवर दु:खाचा मोठा डोंगर कोसळला असला, तरी त्यांच्या वडिलांचा वारसा पुढे नेण्याची ताकदही त्यांच्यात आहे, याची खात्री वाटते.

नानांच्या जाण्याने एक प्रेमळ बाप, जबाबदार कुटुंबप्रमुख, जिवलग मित्र आणि मार्गदर्शक आपण गमावला आहे. पण त्यांनी दिलेली शिकवण, त्यांनी जपलेली माणुसकी आणि त्यांनी निर्माण केलेले नाते हे कायम आपल्या सोबत राहणार आहे. त्यांच्या आकस्मिक निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. चिंचोली फाट्याजवळ झालेल्या अपघातात त्यांचे निधन झाले, ही घटना अत्यंत वेदनादायक आहे. अशा अचानक घडलेल्या घटनेमुळे संपूर्ण परिसरात दु:खाची लाट पसरली आहे. नाना हे केवळ एका कुटुंबाचे नव्हते, तर संपूर्ण समाजाचे होते. त्यांनी आपल्या आयुष्यात अनेकांना मदतीचा हात दिला. त्यांच्या या गुणामुळेच ते सर्वांच्या मनात कायमचे घर करून राहिले आहेत. आज नाना आपल्यात नाहीत, पण त्यांच्या आठवणी, त्यांचे विचार आणि त्यांचे प्रेम हे आपल्या हृदयात सदैव जिवंत राहील. त्यांनी दाखवलेला मार्ग आपण पुढे चालत राहिलो, तरच त्यांच्या आयुष्याला खरी श्रद्धांजली ठरेल. नाना, तुम्ही आमच्यात नाही आहात, ही जाणीव मनाला असह्य वेदना देते. पण तुमचे शब्द, तुमचे मार्गदर्शन आणि तुमचे प्रेम हे आमच्या प्रत्येक पावलावर सोबत राहील, याची खात्री आहे. तुमच्या आठवणींनी मन भरून येते, आणि डोळ्यांतून अश्रू वाहू लागतात. तुम्ही दिलेल्या प्रत्येक क्षणासाठी, प्रत्येक शिकवणीसाठी आम्ही सदैव ऋणी राहू.

भावपूर्ण श्रद्धांजली... ।। शांती ।।

**- राजेश माधव नाईकवाडी (पुतणे), मुंबई**




## समाजकारणात वावरणारा तळमळीचा कार्यकर्ता

सामाजिक, राजकीय व्यवस्थेत हरहुन्नरी स्वभावाने अनेकांशी आपुलकीने लागणारा कै. नानासाहेब नाईकवाडी अकोलेकरांच्या मनाला चटका लावून अकस्मात हरपला. यावर अजूनही विश्वास बसत नाही. मात्र दुर्दैवाने आयुष्यातील उमेदीच्या, उभारीच्या काळात नाना सर्वांनाच हुरहूर लावून अकाली काळाच्या पडद्याआड गेला आहे .

मोठ्या भावाप्रमाणे नानासाहेबाने मला नगरपंचायतच्या कारभारात आणि व्यक्तिश: आपुलकीने कायम भक्कम साथ दिली, वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले. भावासारखा पाठीशी उभा राहिला ही बाब कधीच विसरु शकत नाही. आपुलकी, आस्था हा नानांचा स्वभावच होता. गोरगरीब जनतेसाठी धावून जाणारा आणि अकोल्यातील तालुक्यातील तरुण पोरांचा हक्काचा माणूस सर्वसामान्य जनतेचे काम करणारे आमचे नानासाहेब कधीही न विसरण्यासारखे सामाजिक कार्यकर्ते होते. गोरगरीबांचे कोणतेही काम नगरपंचायत, शासनदरबारी असल्यास नाना व्यक्तीश: त्यासाठी पाठपुरावा करत होते. गावातील आणि सामाजिक कार्यात प्रत्येक कार्यक्रमात नानाचा तळमळीचा सहभाग लक्षात राहणारा आहे. विशेषत: निवडणूकीच्या कालावधीत नानासाहेबाने दिलेली साथ संस्मरणीय ठरली आहे. मी नगराध्यक्ष असल्याने नाना अनेकांचे काम घेऊन यायचे. जे योग्य काम आहे ते झाले पाहिजे असा त्यांचा अट्टाहास असायचा परखडपणा, स्पष्टवक्तेपणा असला तरी तेवढाच स्वभावातील स्नेह आणि मायाळूपणाही नानासाहेबाने कायम टिकवून ठेवला. लोकनेते, तालुक्याचे भाग्यविधाते, माजी मंत्री आदरणीय कै. मधुकरराव पिचड साहेब आणि माजी आमदार वैभवभाऊ पिचड यांना कायम नानांनी हिरीरीने कुशल साथ दिली .

नानासाहेबाच्या मित्र - स्नेही परिवारात नीलेश देशमुख, साहेबराव आरोटे, मच्छिंद्र नवले , मारुती वडजे, डॉ. विराज शिंदे, डॉ. अरुण खताळ, योगेश जोशी, विठ्ठलराव आरोटे, प. सा. चौधरी, लक्ष्मण सदगीर, संजय जाधव, बाळासाहेब गायकवाड, ज्ञानेश्वर गायकवाड, भानुदास तळेकर, भाऊराव नाईकवाडी, रमेश नाईकवाडी, शरद आणि जनार्दन नवले, रामेश्वर रासने, सुनील धोंडिराम गुजर, भानुदास वाकचौरे, अरुण कराड, सुनील घाटगे यांचा कायम स्नेह राहिला .

महालक्ष्मी देवस्थान ट्रस्ट, महालक्ष्मी मित्र मंडळ आणि गणराज मित्र मंडळाकरिता नानासाहेबांनी आपुलकीने सहकार्य केले . नानांचे पुतणे आणि नगरसेवक प्रदीपराज नाईकवाडी यांच्या माध्यमातून नानासाहेबांचे नगरपंचायतसाठी कायम सहकार्य राहिले. नानासाहेबाच्या आठवणी अनेक आहेत. आठवणी हळव्या आहेत. कायम स्मरणात राहतील. मात्र नाना आपल्यात प्रत्यक्ष नसतील याची कायम मनात सल असेल, खंत असेल .

भावपूर्ण आदरांजली

**बाळासाहेब वडजे**
**नगराध्यक्ष, अकोले नगरपंचायत**

## आता रावांधुर चहावर नाना कधीच दिसणार नाही...!



।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।

कदाचित सहा सात वर्षापुर्वीचा विषय असावा, मी मित्रांसोबत रावअंधुरे चहाच्या दुकानावर गेलो होतो तेथे पत्रकारांवर चर्चा सुरु होती. तेव्हा नाना महोदय पत्रकारांना इतके तुच्छ लेखत होते की त्यांच्या मनाला वाट्टेल ते व्यक्त होऊन पत्रकारीतेची इज्जत काढत होते. तेव्हा आमचा फारसा परिचय नव्हता, नाना रोखठोक सार्वभौम पोर्टल वाचत होते पण ते कोण लिहितय हे परिचित नव्हते. त्यामुळे, त्यांच्यात आणि आमच्यात कोणताही जिव्हाळा नव्हता. त्यांचे पत्रकारांवरील मत मी पुर्णपणे खोडून काढले. तेव्हा आमच्यात शब्दिक आणि वैचारिक चकमक झाली. त्यानंतर आमचे मार्ग वेगवेगळे झाले.

दरम्यान, रावांधुरे कट्ट्यावर बसणाऱ्या काही व्यक्तींनी नानांना माझ्याबद्दल सांगितले. त्यानंतर पुन्हा एकदा मी अपसुक रावअंधुरे चहाच्या कट्ट्यावर गेलो. तेथे नाना आणि अनेक लोक बसलेले होते. आता आपल्या तत्वात न बसणारा व्यक्ती म्हटल्यावर मी दुकानात जाऊन बसलो आणि त्यांची मैफिल बाहेर बसलेली होती. त्यावर नाना एकटेच आत आले, त्यांनी पुन्हा चर्चा सुरु केली. ब्लॅकमेरल, हाप्तेखोर, तडजोड, खंडणी हे शब्द तुम्ही सबंध पत्रकारांना वापरु नका. प्रत्येकाचे तत्व वेगवेगळे असू शकतात. त्यावेळी मला वाटतय की तेथे बाबासाहेब आभाळे, राजेंद्र कुमकर हे देखील उपस्थित होते. मी सार्वभौम पोर्टल चालवितोय, सांगा मी तुम्हाला कोठे तडजोड केलेली दिसली, कोठे हाप्ता मागितला किंवा तुम्हाला ब्लॅकमेल करताना दिसलो.! मी अवैध धंदे करणाऱ्यांच्या जाहिराती देखील घेत नाही.

त्यानंतर नाना आणि आमच्यात फार सखोल चर्चा झाली, नाना माझे इतके जवळचे मित्र झाले. की, मी दिसलो नाही तरी ते फोन करायचे. नाना मोदी साहेबांचे फॅन आणि मी पक्ष तथा वैचारिक मतभेदाचा म्हणून विरोधक. नानांचा पुतन्या काँग्रेसकडून लढला तेव्हा मोदी सोडून काँग्रेसचा प्रचार यावर आमची घमासान होत होती. नानांनी मुद्द्यात पकडायला मला फार आवडत होते. ते चुकीला चुक आणि सत्याला सत्य म्हणायचे. इतका परखड आणि दिलदार माणूस नाना होते.

शुभम फापाळे आणि नाना यांच्यातील टिंगल टवाळीचा कायम मी पुरावा तथा प्रमाण रहायचो, नाना म्हणजे माझ्यासाठी असा माणूस की कोणतेही संकट आले जसे ईश्वरभाऊ, दोन विकासराव, संदिपभाऊ आणि अशी काही मोजकी नावे डोळ्यासमोर आणायची असा संदेश मी मेंदुत ठेवला होता. त्यात नानांचे नाव त्या पाच पैकी एक होते. आज दुर्दैवाने नानांचा हा संदेश वाचून आंगातील त्राण निघून गेला आहे. नानांना माझ्या मैत्रीवर इतका विश्वास होता की, कोणाचे पोलीस ठाणे, प्रांत, तहसिल किंवा माझ्या जोगे काम वाटले की ते संबंधित व्यक्तीला माझा नंबर द्यायचे. अन नाना म्हटलं की मी कधीच दुर्लक्ष केले नाही. पण आता नानांचा फोन येणार नाही, नाना दिसणार नाही ही दु:ख फार मोठे आहे. अगदी काल परवा आम्ही तहसिल समोर विठ्ठल काका यांच्या भजे दुकानावर बसलो होते. नाना घरी चालले होते. मी आवाज दिला आणि नाना वळून मागे आले. गाडीवर बसून म्हणाले जातो जरा काम आहे, म्हटलं रस प्या आणि मग जा. नाही नाही म्हणता उतरले आणि तब्बल तास दिडतास आम्ही बसून अनेक विषयांवर गप्पा मारल्या.

नानांच्या आठवणी संपता संपणार नाही. आमची इतकी मैत्री झाली होती. की, जेव्हा खरेदी विक्री संघाची निवडणुक लागली तेव्हा नाना देखील उभे होते. तसेतर मी नानांच्या पार्टी विरोधात काम केले. पण, माझी झडपड नानांसाठी देखील होती. तेव्हा मी मतमोजणी कक्षेत होतो, मतमोजणीच्या वेळी नानांचा विजय झाला आणि मी त्यांना फोन लावून बातमी दिली. त्याच दरम्यान आमच्यातील एका बड्या नेत्याचा फोन आलो आणि मी त्यांनाही आनंदाने सांगितले, नाना नाईकवाडी निवडून आले. तेव्हा ते म्हणाले, आरे त्यांचे सोड आपले किती आले ते सांग.! नानांचा विजय म्हणजे माझ्यासारख्या त्यांच्या मित्राला अराजकीय पण मैत्रीपुर्ण आनंद होता. नानांच्या अनेक गोष्टी कधीच स्मरणातून जाणार नाही.

अकोल्याला आलं म्हणजे चालुचालु रावअंधुरे चहावर जायचं, तेथे नाना भेटले तर भरपुर वेळ यू निघून जायचा. पण, आता नाना रावअंधुरे चहावर कधीच दिसणार नाही, कधी आमची भेट होणार नाही, राजकीय चर्चा होणार नाही. नाना तुम्ही नि:शब्द करुन गेलात. अनेक गोष्टी सांगण्यासारख्या आणि न सांगण्यासारख्या आहेत. नानांचे जाणे म्हणजे अविश्वसनिय आहे. अजित दादा गेल्यानंतर प्रचंड हळहळ वाटली होती, तिच हळहळ नानांच्या जाण्याने झाली आहे. नाना नाहीत हे मनाला पटेना...!!!

**ॲड. सागर शिंदे**
**संपादक, दैनिक सार्वभोम**

## कै. नानासाहेब मारूती नाईकवाडी यांना

## ।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।



**शोकाकूल**

नागराज उद्योग समुह, अकोले, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

अकोले तालुका कॉंग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते, अकोले, जि. अहिल्यानगर

अकोले नगरपंचायत, अकोले, जि. अहिल्यानगर

अकोले तालुका खरेदी विक्री संघ, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

अगस्ति सह. साखर कारखाना, अकोले, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

बुवासाहेब नवले को. ऑप. सोसायटी, अकोले, जि. अहिल्यानगर

अभिनव शिक्षण संस्था, अकोले, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

बुवासाहेब नवले सह. पतसंस्था, अकोले, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी, अकोले, जि, अहिल्यानगर

अमृतसागर दुध संस्था, अकोले, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग – प्रसुति
• मुळव्याध–भगंदर–फिशर
• लेझर सेंटर
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line : 7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# स्वरसम्राज्ञी आशाताई भोसले आणि संगमनेरचे जिव्हाळ्याचे नाते



**आशा भोसले या भारतातील महान पार्श्वगायिका होत्या. त्यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगली येथे झाला. त्यांनी हिंदी, मराठीसह २० हून अधिक भाषांमध्ये १२,००० पेक्षा अधिक गीते गायली आहेत. भारतीय संगीत क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना पद्मविभूषण, दादासाहेब फाळके पुरस्कार यांसारख्या अनेक सन्मानांनी गौरविण्यात आले. त्यांचे निधन १२ एप्रिल २०२६ रोजी ९२ व्या वर्षी झाले. त्यांच्या जाण्याने भारतीय संगीतसृष्टीत एक युग संपले, मात्र त्यांचे स्वर आजही रसिकांच्या मनात अजरामर आहेत.**

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी) -

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर शहर व तालुक्याला मोठी सांस्कृतिक समृद्ध परंपरा लाभली आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी ही वैभवशाली परंपरा जपताना सातत्याने विविध संत आणि कलावंतांना संगमनेरमध्ये बोलावून त्यांचा सन्मान केला आहे. २०१४ मध्ये पद्मभूषण स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांचा संगमनेरमध्ये झालेला लाखोंच्या उपस्थितीतील कार्यक्रम आजही जिल्ह्यातील सर्वांच्या आठवणीत आहे. संगमनेर आणि आशाताई यांचे कायम जिव्हाळ्याचे नाते या निमित्ताने अधिक वृद्धिंगत झाले.

जाणता राजा मैदान येथे सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात व हरित क्रांतीचे प्रणेते डॉ. अण्णासाहेब शिंदे यांच्या जयंती महोत्सवानिमित्त तत्कालीन महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या



पुढाकारातून आशा भोसले लाईव्ह कॉन्सर्ट २०१४ मध्ये संपन्न झाला होता.

या कार्यक्रमांमध्ये स्वतः आशाताईंनी मराठी, हिंदी अशी विविध गाणी गायली. सुमारे लाखभर प्रेक्षकांची उपस्थिती, भव्य दिव्य स्टेज, अत्याधुनिक व दर्जेदार आसन व्यवस्था, पार्किंग व्यवस्था, लाईट एलईडी अशा सर्व सुविधांमध्ये झालेला आशा कॉन्सर्ट २०१४ हा सर्वांच्या लक्षात राहिला. यावेळी आशा भोसले यांनी अमृत उद्योग समूहाला भेट देऊन विविध सहकारी संस्थांची पाहणी केली. यावेळी तत्कालीन महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, कांचनताई थोरात, दुर्गाताई तांबे यांच्या हस्ते आशा भोसले यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सुधीर गाडगीळ यांनी आशाताई भोसले यांची प्रकट मुलाखत घेतली.

यावेळी आशा भोसले म्हणाल्या की, यशवंतराव चव्हाण यांचा वारसा जोपासणारे बाळासाहेब थोरात हे महाराष्ट्राचे सुसंस्कृत नेतृत्व आहे. सर्वांना सोबत घेऊन त्यांनी संगमनेर तालुक्याचा विकास केला आहे. याचबरोबर राज्यामध्ये अत्यंत स्वच्छ व पारदर्शकपणे चांगले काम करणारे ते मंत्री आहेत. कायम जनतेमध्ये राहणारा सुस्वाभावी असणारा हा नेता नक्कीच महाराष्ट्राचे उज्वल भविष्य ठरणार आहे. याचबरोबर बाळासाहेब, तुम्हाला महाराष्ट्रात खूप मोठे काम करायचे आहे, असा आशीर्वाद त्यांनी दिला.

जानेवारी २०२३ मध्ये माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचा नागपूर येथे अपघात होऊन खांद्याला दुखापत झाली होती. यावेळी आशाताई यांनी अगदी आस्थेवाईकपणे दवाखान्यामध्ये जाऊन माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांची चौकशी केली. भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या निधनानंतर माजी मंत्री थोरात यांनी मंगेशकर कुटुंबीयांची भेट घेऊन सर्वांचे सांत्वन केले. यावेळी आशा भोसले, उषा मंगेशकर, पंडित हृदयनाथ मंगेशकर यांचा मंगेशकर कुटुंबीय उपस्थित होते. त्यानंतर २०२४ मध्ये झालेल्या जयंती महोत्सवाच्या वेळी सुरू असलेल्या कार्यक्रमांमध्ये आशाताईंनी फोन करून संगमनेरकरांवरती प्रेम व्यक्त केले व उपस्थित सर्व संगमनेरकरांना शुभेच्छा दिल्या.

वयाच्या ९२ व्या वर्षी आशाताईंनी अखेरचा श्वास घेतला आणि संगमनेरकरांसाठी ही अत्यंत दुःखद घटना घडली. अनेक आठवणी संगमनेरकरांच्या पद्मभूषण स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांच्या समवेत असल्याने जिव्हाळ्याचे नाते कायम राहिले.

## देशाचा सुरमयी आवाज हरपला – माजी मंत्री थोरात

गेली आठ दशके भारतीय संगीत क्षेत्रात आपल्या दैवी आवाजाने प्रत्येकाला खेळवून ठेवणाऱ्या आशाताई भोसले यांनी १२००० हून अधिक गाणी गायली. त्यांच्य निधनाने संगीत क्षेत्राची मोठी हानी झाली असून, देशाचा सुरमयी आवाज हरपला आहे.

आशाताईंनी आठ दशकावून अधिक काळ भारतीय संगीताची सेवा केली असून, २० पेक्षा जास्त भाषांमधून सुमारे १२५०० गीतांचे गायन केले आहे. त्यांना महाराष्ट्र भूषण, पद्मभूषण, दादासाहेब फाळके या विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले. देशातील प्रत्येकाची सकाळ व संध्याकाळ आशाताईंच्या गाण्याने होत होती. शास्त्रीय संगीत ते आधुनिक संगीतामधील सर्व गाणी त्यांनी गायली.

२०१४ मध्ये संगमनेरला त्यांनी लाईव्ह कॉन्सर्ट मोठ्या आनंदाने केला. यावेळी झालेली त्यांची प्रकट मुलाखत प्रत्येकाच्या स्मरणात आहे. संगमनेरकरांवर त्यांनी कायम प्रेम केले असून, त्यांच्या निधनाने देशाच्या संगीत क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून, देशाचा सुरमई आवाज हरपल्या असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

## भारताने आपला प्रिय आवाज गमावला - आ. सत्यजित तांबे

आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, भारताने आज आपला सर्वात प्रिय आवाज गमावला आहे. एक असा आवाज, ज्याने पिढ्यान पिढ्या लाखो लोकांच्या हृदयाला स्पर्श केला. प्रत्येक पिढीतील नागरिकांसाठी आशाताईंनी गायलेले विविध गीतेही आनंद देणारी आहेत. त्यांच्या निधनाने देशाच्या संगीत क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## पुन्हा आशाताई होणे नाही - डॉ. जयश्री थोरात

भजन, सुगम संगीत, शास्त्रीय संगीत अशा विविध गीतांमधून आशाताईंनी लाखो रसिकांना नेहमी खेळवून ठेवले. संगीताबरोबर सामाजिक क्षेत्रातही त्यांनी मोठे योगदान दिले. १२००० पेक्षा जास्त गाणी गाणाऱ्या आशाताई पुन्हा होणे नाही, अशी भावना युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांनी व्यक्त केली आहे.

**माजी आमदार डॉ. तांबे म्हणाले की, मागील आठ दशके संगीत आणि आशाताईंचे गीते हे एक सूत्र होते. नव्या पिढीमध्ये सुद्धा अशा ताईंनी अनेक चांगली गीते देशाला दिली. भजन ते पॉप गीते हा त्यांचा प्रवास नव्या गायकांसाठी सदैव प्रेरणादायी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.**

# अकोले तालुका माहेश्वरी सभेच्या अध्यक्षपदी निरज मुंदडा, मंत्रीपदी प्रसाद राठी

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

अकोले येथील तालुका माहेश्वरी सभेच्या सन २०२६ ते २०२९ च्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी निरज मुंदडा, तर मंत्री पदी प्रसाद राठी यांची बिनविरोध निवड झाली.

विठ्ठलदास भुतडा हे निवडणूक निर्णय अधिकारी होते. तर त्यांना निवर्तमान अध्यक्ष विजय सारडा व मंत्री विशाल राठी यांनी सहाय्य केले. बिनविरोध निवड झालेली कार्यकारणी पुढीलप्रमाणे - अध्यक्ष - निरज मुंदडा, मंत्री - प्रसाद राठी, उपाध्यक्ष - चेतन बुब, कोषाध्यक्ष - गौतम मुंदडा, संघटन मंत्री - सर्वेश डांगरा, सह सचिव - अल्पेश सारडा, जिल्हा प्रतिनिधी - सोमनाथ मुंदडा व रामनिवास राठी, पदेन - विजय सारडा व विशाल राठी, तर कार्यकारणी सदस्य सुरेशकुमार करवा यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित सर्व पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



**अध्यक्ष - निरज मुंदडा सचिव - प्रसाद राठी**


प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होणारे, कधीही कोणावर न रागवणारे, सर्वांना आपलेसे करून घेणारे, विविध सामाजिक कामात हिरीरीने सहभागी होणाऱ्या निरज मुंदडा यांचेवर सोपविण्यात आलेली अध्यक्षपदाची धुरा म्हणजे ही त्यांच्या आजपर्यंतच्या सामाजिक कामाची मिळालेली पावतीच आहे, असे म्हटलं तर वावगं ठरू नये.

तर अध्यक्ष निरज मुंदडा व त्यांचे सहकारी निश्चितच माहेश्वरी समाज बांधवांच्या विश्वासास पात्र असेच भरीव काम करतील, असा विश्वासही प्रदेश जनसंपर्क मंत्री अजय जाजू यांनी व्यक्त केला. यावेळी विजय राठी, सतीश बुब, रमेशचंद्र सारडा, श्यामसुंदर मुंदडा, विजय राठी, शुभम मणियार, धनंजय जाजू, पंकज बुब, आनंद मुंदडा आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत निवर्तमान अध्यक्ष विजय सारडा यांनी केले, तर आभार निवर्तमान मंत्री विशाल राठी यांनी मानले.

# संगमनेरमध्ये १९ एप्रिलला 'अनुभवाचे अंतरंग' पुस्तकाचा प्रकाशन सोहळा

संगमनेर (प्रतिनिधी)-

अशोक शेटे यांच्या 'अनुभवाचे अंतरंग' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा येत्या रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. संगमनेर येथील स. म. भाऊसाहेब थोरात महाविद्यालयाच्या के. बी. दादा देशमुख सभागृहात दुपारी ४.०० वाजता संपन्न होईल.




या सोहळयाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे ज्येष्ठ शिक्षक नेते मा. रावसाहेब रोहोकले गुरुजी राहणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन विधान परिषदेचे माजी सदस्य मा. सुधीर तांबे, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. आनंद भंडारी आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. संदीप सांगळे यांच्या हस्ते होणार आहे.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे ज्येष्ठ साहित्यिक मा. डॉ. संजय कळमकर, माजी नगराध्यक्षा मा. सौ. दुर्गाताई तांबे, चपराक प्रकाशनाचे मा. घनश्याम पाटील, प्रसिद्ध समीक्षक मा. डॉ. कैलास दौंड, नामवंत कवी शशिकांत शिंदे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ, 'युवावार्ता'चे संपादक मा. किसनभाऊ हासे, इतिहास अभ्यासक डॉ. संतोष खेडलेकर, नायकचे संपादक गोरक्षनाथ मदने, गटशिक्षण अधिकारी बाळासाहेब गुंड, राजेश पावसे, शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे, साहित्यिक व व्याख्याते डॉ. संजय गोर्डे, शिक्षक नेते प्रवीण ठुबे, कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब वाघ उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. यासोबतच यांसारख्या विविध क्षेत्रांतील दिग्गजांची उपस्थिती लाभणार आहे.

शिक्षक नेते आर. पी. राहणे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली 'महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, शाखा संगमनेर' या कार्यक्रमाचे नियोजन करत आहे. या प्रकाशन सोहळयाला तालुक्यातील शिक्षक, साहित्यप्रेमी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परीक्षेत अगस्ती इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अकोलेचे यश

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

अगस्ती इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन ॲण्ड रिसर्च, अकोले या परिसंस्थेने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नुकत्याच जाहीर झालेल्या परीक्षांमध्ये घवघवित यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांनी उज्वल यश मिळवत संस्थेचा ध्वज पुन्हा एकदा अभिमानाने उंच फडकवला आहे.

एमबीए विभागात देशमुख रमेश याने ७१.३३% गुणांसह विभागात प्रथम क्रमांक , देशमुख योगेश याने ७०.२९% गुणांसह द्वितीय, तर मरवट वैष्णवी हिने ६७.४२% गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला आहे. एमबीए प्रथम वर्षामध्ये कु. देशमुख ऋतुजा हिने ६७.८८% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. पवार संदिप याने ६५.६३% गुणांसह द्वितीय आणि गायकवाड प्रियांका व गोरे सायली यांनी ६५.३८% सारखेच गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. तसेच थेट द्वितीय वर्ष एम.बी.ए. (लॅटरल एन्ट्री) चा निकाल देखील जाहीर झाला असून, त्यामध्ये पन्हाळकर अर्चना ६८.८८% गुणांसह प्रथम क्रमांक तसेच कर्पे अभिषेक याने ६६.६३% गुणांसह द्वितीय, तर आभाळे ऋतुजा हिने ६५.३८% गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला आहे.

एमसीए विभागामध्ये, कु. गोर्डे अनुजा हिने ७९.८२% गुण मिळवत विभागात प्रथम क्रमांक पटकावला, प्रिया म्हाळू हिने ७३.६४% गुणांसह द्वितीय, तर कातोरे प्रियांका हिने ७२.१८% गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला आहे. एमसीए प्रथम वर्षात, देशमुख पुनम अरुण हिने ६८.१७% गुणांसह प्रथम क्रमांक, लांडे पूजा हिने ६५.८३% गुणांसह द्वितीय, तर आभाळे नम्रता हिने ६५.६७% गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला आहे. अशी माहिती परीक्षा विभागप्रमुख प्रा. सुयोग गजे यांनी दिली.

या यशाबद्दल अ.ता.ए. सोसायटीचे कार्यकारी कायमस्वरूपी विश्वस्त वैभवराव पिचड, कायमस्वरूपी विश्वस्त गिरजाजी जाधव, स्विकृत विश्वस्त सुरेशराव कोते, मधुकर सोनवणे, डॉ. संपतराव वैद्य, अध्यक्ष सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, खजिनदार धनंजय संत, सर्व विश्वस्त व कार्यकारिणी सदस्य, परिसंस्थेचे संचालक डॉ. प्रशांत तांबे, एमबीए विभाग प्रमुख डॉ. गोपाल बूब, एमसीए विभाग प्रमुख प्रा. अमोल नवले तसेच सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले.

परिसंस्थेचे प्राध्यापक हे नेहमीच गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी परिसंस्था कायम पुढे असून, हे यश त्या प्रयत्नांचे फलित असल्याचे गौरवोद्गार परिसंस्थेचे संचालक डॉ. प्रशांत तांबे यांनी व्यक्त केले.

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई–मेल : tahsildarsangamner@gmail.com
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/५३०/२०२६
संगमनेर, दिनांक – २४/०३/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. फरीदा अब्दुलकरीम सय्यद, रा. आंबी खालसा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक २४/०२/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. आंबी खालसा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे सय्यद फरिदा करीम यांचा जन्म मौजे आंबी खालसा, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०२/०९/१९७८ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी आंबी खालसा यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी आंबी खालसा यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

# ११ जणांचा जागीच मृत्यू, कल्याण-नगर महामार्गावर भीषण अपघात

अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)-

कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर आज काळजाचा थरकाप उडवणारा भीषण अपघात झाला आहे. एका इको कार आणि सिमेंट मिक्सर ट्रकची समोरासमोर जोरदार धडक झाली असून, या भीषण अपघातात अकरा प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर एक जण गंभीर जखमी झाला असून, त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.



मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात इतका भीषण होता की, दोन्ही वाहनांच्या धडकेनंतर इको कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. सिमेंट मिक्सर आणि कारची समोरासमोर धडक झाल्याने कारमधील प्रवाशांना बाहेर पडण्याची संधीही मिळाली नाही. या भीषण धडकेत अकरा जणांनी जागीच प्राण गमावले आहेत.

अपघाताचा आवाज होताच परिसरातील स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि स्थानिक पोलीस प्रशासनही घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने कारमध्ये अडकलेल्या मृतदेहांना आणि जखमीला बाहेर काढले.

या अपघातातील एकमेव गंभीर जखमी व्यक्तीला तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले आहे. मृतांची ओळख पटवण्याचे काम सध्या पोलिसांकडून सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

# अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये 'EXCALIBUR 4.0' चे दिमाखात आयोजन

## देशभरातून ७७०+ विद्यार्थी, २५०+ टीम्सचा उत्स्फूर्त सहभाग; नवकल्पना आणि तंत्रज्ञानाचा संगम

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर येथे दिनांक १० व ११ एप्रिल २०२६ रोजी "EXCALIBUR ४.०' या राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला देशभरातून तब्बल २५० पेक्षा अधिक टीम्स आणि ७७० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून या उपक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद दिला. महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश, तेलंगणा, राजस्थान आणि छत्तीसगड या राज्यांमधून विद्यार्थ्यांचा सहभाग लाभल्याने हा कार्यक्रम खऱ्या अर्थाने राष्ट्रीय पातळीवर गाजला.





या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे साळुंके ऑटोमेशन प्रा. लि. नाशिक चे संस्थापक साहेबराव साळुंके, फॉक्स सोल्युशन्स प्रा. लि. नाशिकचे इंडस्ट्रियल सेल जनरल मॅनेजर प्रल्हाद धुमाळ, ऊर्जा खखढ अकॅडमी अकोले संचालक डॉ. सुशील बेणके, वराडोम टेक्नॉलॉजीज प्रा. लि. चाकण पुणेचे संस्थापक संदीप बन्सी गिऱ्हे यांच्या हस्ते करण्यात आले.

या तांत्रिक महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांनी रोबो वॉर, रोबो रेस, रोबोथॉन, डिझाईन अरेना, पेपर प्रेझेंटेशन, पोस्टर प्रेझेंटेशन आणि

ई-स्पोर्ट्स अशा विविध स्पर्धांमध्ये आपल्या कल्पनाशक्तीला वास्तवात उतरवले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाविन्यपूर्ण संकल्पना, तांत्रिक कौशल्य आणि स्पर्धात्मक वृत्ती पाहून उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक व्यक्त केले.

कार्यक्रमादरम्यान प्रमुख पाहुण्यांनी प्रा. हेमंत पठाडे यांच्या उत्कृष्ट नियोजन आणि अंमलबजावणीचे विशेष कौतुक केले. नाशिक, पुणे, अहिल्यानगर व छत्रपती संभाजीनगर येथील अनेक महाविद्यालयांमध्येही अशा दर्जाचा कार्यक्रम क्वचितच पाहायला मिळतो, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञान समजून घेण्याची, अनुभव घेण्याची आणि स्वतःच्या कल्पना सादर करण्याची उत्कृष्ट संधी मिळाली. शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि कौशल्य अधिक वृद्धिंगत झाल्याचेही यावेळी स्पष्टपणे जाणवले.

या फेस्टमधील विजेत्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, विश्वस्त शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, मॅनेजर विवेक धुमाळ, डायरेक्टर अकॅडमिक्स डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश, विभाग प्रमुख डॉ. विलास शिंदे, कार्यक्रम व्यवस्थापक प्रा. हेमंत पठाडे, सर्व शिक्षक आदींसह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

अशा प्रेरणादायी आणि भव्य तांत्रिक महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि आयोजकांचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, भविष्यातही अशाच नाविन्यपूर्ण उपक्रमांची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सायबर सुरक्षितता ग्राहकांचा विश्वास टिकवण्यासाठी महत्त्वाची - आ. खताळ

## संगमनेरला जिल्हा बँक असोसिएशनचे सहकारी बँक संमेलन उत्साहात

संगमनेर (प्रतिनिधी)-

सध्याच्या वेगाने बदलणाऱ्या काळात सहकारी बँकिंग क्षेत्र नव्या टप्प्यावर उभे असून, आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्याशिवाय प्रगती शक्य नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता (कृबु) मुळे बँकिंग सेवा अधिक वेगवान, अचूक आणि सुरक्षित होत असून, सायबर सुरक्षितता ही ग्राहकांचा विश्वास टिकवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे, असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले.




कासारा दुमाला (ता. संगमनेर) येथील मालपाणी हेल्थ क्लब येथे अहिल्यानगर जिल्हा नागरी सहकारी बँका संघटनेच्या वतीने आयोजित सहकारी बँक संमेलनाचे उद्घाटन आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते झाले. त्यावेळी मार्गदर्शन करताना आ. खताळ म्हणाले की, सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या काळामध्ये बँकांनी डिजिटल, सुरक्षित आणि ग्राहकाभिमुख बँकिंगकडे वाटचाल करताना युवकांसाठी आधुनिक सेवा व नवकल्पनांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि सहकाराची ताकद यामुळेच भविष्यातील बँकिंग क्षेत्र अधिक सक्षम व विश्वासार्ह होईल, असेही आमदार खताळ यांनी सांगितले.

अहिल्यानगर जिल्हा नागरी सहकारी बँक संघटना ही सन १९८३ पासून कार्यरत असून, तिच्या माध्यमातून १८ सभासद व १७ सहयोगी अशा एकूण ३५ बँकांना एकत्र आणण्यात आले आहे. विविध प्रशिक्षण उपक्रम, कायदेशीर वसुली प्रक्रिया तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बँकांच्या अडीअडचणी सोडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संघटना करत असल्याची माहिती संघटनेच्या अध्यक्ष सत्येन मुंदडा यांनी आपल्या प्रास्ताविकातून दिली. यावेळी मधुसूदन नावंदर, प्रकाश राठी, नानासाहेब शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# अनुराधा आहेर यांना काव्यगौरव पुरस्कार जाहीर

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर येथील सामाजिक कार्यकर्त्या व कवयित्री अनुराधा आहेर यांना राज्यस्तरीय राष्ट्रसंत गाडगेबाबा काव्यगौरव पुरस्कार २०२६ नुकताच जाहीर झाला असून, डेबूजी फौंडेशन (म.रा.) राहाता आणि कवी सरकार स्वाभिमानी वाचनालय, इंगळी, जि. कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शिर्डी येथे आयोजित २८ वे राष्ट्रीय राष्ट्रसंत गाडगे महाराज मराठी ग्रामीण साहित्य संमेलनात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी कळविले आहे. त्यांच्या 'मी बाईपणात माझ्या' या काव्य संग्रहाच्या द्वितीय आवृत्तीचे



प्रकाशनही या संमेलनात करण्यात येणार आहे.

स्त्रीचे आयुष्य अनेक भाव-भावनांनी विणलेले असते, माया, वेदना, संघर्ष, प्रेम आणि आत्मसन्मान. 'मी बाईपणात माझ्या' या कवितासंग्रहात कवयित्रीने स्त्रीमनातील हळुवार भावना, तिच्या आयुष्यातील संघर्ष आणि तिच्या अस्तित्वाचा शोध अत्यंत संवेदनशील शब्दांत मांडला आहे. या कविता स्त्रीच्या आयुष्याचा प्रवास उलगडतात, कधी आई म्हणून, कधी मुलगी म्हणून, तर कधी समाजाशी लढणारी एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून.

साध्या पण प्रभावी भाषेत लिहिलेल्या या कविता वाचकांच्या मनाला नक्कीच स्पर्श करतील. अनुराधा आहेर या संवेदनशील कवयित्री असून, सामाजिक वास्तव आणि स्त्रीमनातील भावविश्व त्यांच्या लेखनाचा मुख्य विषय आहे. साध्या आणि प्रभावी शब्दांत त्या जीवनातील अनुभव, संघर्ष आणि आशा यांना कवितेतून व्यक्त करतात. पुरस्काराबद्दल त्यांचे साहित्य क्षेत्रात सर्वत्र कौतुक होत आहे.

# गोरक्षण संस्थेचा नंदि शाळा उपक्रम पथदर्शक ठरेल - शेखर मुंदडा

संगमनेर (प्रतिनिधी)

'देशी वाणाच्या गोवंशाच्या संवर्धनामुळे प्रचंड मोठी आरोग्य क्रांती घडू शकते. त्यामुळे देशी वाणाचे गोवंश प्राणपणाने जपले पाहिजेत. मालपाणी परिवाराच्या पुढाकारामुळे संगमनेरमध्ये गोरक्षण संस्थेतर्फे उभारण्यात आलेला राज्यातील पहिला वहिला नंदी शाळा उपक्रम त्या दृष्टीने नक्कीच पथदर्शक ठरेल. देशी गोवंश आधारित शेतीतून भविष्यात हमखास निरोगी पिढी घडेल', असा विश्वास महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी येथे व्यक्त केला.



संगमनेर तालुक्यातील धांदरफळ येथे ध्रुव ग्लोबल स्कूलच्या आवारात मालपाणी परिवाराच्या सौजन्याने व ध्रुव ग्लोबल स्कूलच्या सहयोगाने गोरक्षण संस्था संगमनेर द्वारा संचालन केल्या जाणाऱ्या ओम नंदी शाळेचा उद्घाटन सोहळा महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांच्या हस्ते संपन्न झाला. त्यावेळी उद्घाटन पर भाषण करताना त्यांनी वरील आशावाद व्यक्त केला. यावेळी व्यासपीठावर गोरक्षण संस्थेचे विश्वस्थ ओंकार अट्टल, श्रीगोपाल पडताणी, मनोज पोफळे, श्रीमती ललिता मालपाणी, श्रीमती सुवर्णा मालपाणी, गोरक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय मालपाणी आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री. मुंदडा आपल्या भाषणामध्ये पुढे म्हणाले की, 'महाराष्ट्रामध्ये आजमीतिला १०६८ गोशाळा आहेत. मात्र नंदी शाळा एकही नव्हती. मालपाणी परिवाराच्या सहाय्याने गोरक्षण संस्थेने ही उणीव भरून काढली. काळाच्या ओघामध्ये पूर्वी कामधेनू म्हणून गौरविले गेलेली आमची देशी गाय लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. संकरित प्रजातीच्या होस्टन आणि जर्सी या गाई आमच्यावर लादल्या गेल्या आहेत. मात्र, त्याचे दुष्परिणाम भयानक स्वरूपात पाहायला मिळत आहेत. राज्य सरकारने देशी गाईचे महत्व ओळखून तिची जोपासना करणाऱ्या गोशाळांना १४० कोटी रुपयांचे अनुदान देऊन मोठी चालना दिली आहे. गोमय आणि गोमूत्र यातून तयार होणारे गोखत, म्हणजेच रसायनमुक्त शेतीचा, अर्थातच गोवंश आधारित प्राकृतिक शेतीचा मूलमंत्र आहे. त्यामुळे 'सेव्ह काऊ' - गोवंश वाचवा', असा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या क्षेत्रातील प्रचंड अभ्यासू तज्ञ मंडळींच्या मार्गदर्शनानुसार मानव जातीतील सतोगेट मदर सारखे अद्ययावत शास्त्रीय प्रयोग देखील गोवंश जतन करण्यासाठी यशस्वी ठरले आहेत. शासनाच्या पशुपालक उद्योजक योजनेला भरघोस अनुदान असून, त्यातून ग्रामीण भागातील अनेक युवकांच्या चरितार्थाची देखील सोय होणार आहे. त्यामुळे प्रत्येकाला शहराकडे धावण्याची गरज भासणार नाही'.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना गोरक्षणचे अध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी नंदी शाळा उभारण्यामागील आपली भूमिका सविस्तर विशद केली. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन ध्रुव ग्लोबल स्कूलच्या वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नितीन सूर्यवंशी यांनी, तर आभार प्रदर्शन मकरंद रानडे यांनी केले. कार्यक्रमासाठी संगमनेरमधील अनेक सामाजिक कार्यकर्ते बंधू-भगिनी उपस्थित होते.

# महंत भास्करगिरी महाराजांना मातृशोक

नेवासे (युवावार्ता प्रतिनिधी)-

श्री क्षेत्र देवगड संस्थान, श्री गुरुदेव दत्त पीठाचे महंत हभप भास्करगिरी महाराज यांच्या मातोश्री गुरुमाऊली सरुबाई ज्ञानदेव पेसोडे यांचे रविवारी (दि. १२) सकाळी ६ वाजून १४ मिनिटांनी निधन झाले. वयाच्या ९९ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने देवगड परिसरासह संपूर्ण वारकरी संप्रदाय व भक्तपरिवारावर शोककळा पसरली. सकाळपासूनच श्रीक्षेत्र देवगड येथे भाविकांची मोठी गर्दी उसळली होती.

अखंड भजन, नामस्मरण आणि भावपूर्ण वातावरणात श्रद्धांजली अर्पण करण्यात येत होती. अंत्यदर्शनासाठी मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली. यामध्ये माजी जिल्हा परिषद अध्यक्ष शालिनी विखे, राजश्री घुले, माजी आमदार चंद्रशेखर घुले, शंकरराव गडाख, बाळासाहेब मुरकुटे, आमदार विठ्ठलराव लंघे आदी उपस्थित होते. सायंकाळी साडेचार वाजता देवगड संस्थान परिसरातील भोजन कक्षासमोर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात हभप भास्करगिरी महाराज, मधुकर पेसोडे हे दोन पुत्र, तसेच कमलबाई रायपुरे ही कन्या असा परिवार आहे.




# निळवंडे धरणातून लाभक्षेत्रासाठी उन्हाळी आवर्तन सोडावे

## निळवंडे पाट पाणी कृती समितीची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी दुष्काळी भागातील १८२ गावांसाठी निळवंडे धरण व कालवे पूर्ण केले. सध्या उन्हाची तीव्रता वाढत असून पिण्यासाठी पाणी व पशुधन वाचवण्यासाठी पाण्याची अत्यंत गरज आहे त्यामुळे प्रशासनाने निळवंडे धरणातून लाभक्षेत्रासाठी उन्हाळी आवर्तन सोडावी अशी आग्रही मागणी निळवंडे पाट पाणी कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

घुलेवाडी येथील कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग यांच्या कार्यालयात कृती समितीच्या कार्यकर्त्यांनी पाणी सोडण्याबाबतच्या मागणीचे निवेदन दिले. यावेळी कृती समितीचे अध्यक्ष नानासाहेब शेळके, उपाध्यक्ष उत्तमराव घोरपडे, प्रभाकर गायकवाड, विजय मगर, विलास गुळवे ,मच्छिंद्र काळे, दत्ता भालेराव, अनिल गुंजाळ ,संतोष राऊत यांच्यासह विविध कार्यकर्ते उपस्थित होते. ही निवेदन कार्यकारी अभियंता कवडे व हापसे यांनी स्वीकारले.

सध्या सर्वत्र उन्हाची तीव्रता वाढत आहे त्यामुळे पिण्याच्या पाण्याची मोठी कमतरता निर्माण झाली आहे याचबरोबर पशुधनासाठी ही पाण्याची आवश्यकता आहे लाभक्षेत्रामध्ये शेतकऱ्यांनी उभी केलेली पिके जळून चालली आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासह पशुधनासाठी व उभे असलेल्या पिकांसाठी पाण्याची अत्यंत गरज आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी दुष्काळी भागातील १८२ गावांसाठी हे धरण व कालवे पूर्ण केले मात्र सध्याचे प्रशासन शेतकऱ्यांच्या बाबत अत्यंत उदासीन असून आता उन्हाळ्यामध्ये पाण्यासाठी कोणतीही तडजोड न करता तातडीने एप्रिल अखेरपर्यंत आवर्तन मिळाले पाहिजे अशी मागणी अध्यक्ष नानासाहेब शेळके यांनी केली तर सचिव उत्तमराव घोरपडे म्हणाले की शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे मात्र त्यालाच उपाशी ठेवले जात आहे पाणी मिळत नसेल तर आम्हाला गुरे ढोरे व माणसांसह रस्त्यावर येऊन तीव्र आंदोलन छडावे लागेल असा इशारा त्यांनी दिला.

यानंतर कार्यकारी अभियंता हापसे व कवडे यांनी आपल्या मागणीचा विचार करून या महिनाअखेरीस पाणी सोडण्यासाठी पाठपुरावा करू असे आश्वासन दिले.

या मागणीमुळे तळेगाव सह दुष्काळी भागातील सर्व नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून पाठ पाणी कृती समितीने घेतलेल्या आंदोलनाच्या इशाऱ्याला सर्व गावातील जनतेने पाठिंबा दिला आहे.




# टंचाईचे प्रस्ताव येताच तात्काळ टँकर सुरू करा

## आ. अमोल खताळ यांच्या आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- टंचाईच्या काळात जनतेला पाणी देणे ही आपली सर्वांची नैतिक आणि प्रशासकीय जबाबदारी आहे. ज्या ठिकाणी पाणीटंचाई भासत आहे, त्या भागाचा प्रस्ताव येताच कोणत्याही तांत्रिक कारणास्तव विलंब न लावता तत्काळ पाण्याचे टँकर सुरू करा, अशा सक्त सूचना आमदार अमोल खताळ यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिल्या.

संगमनेर येथील प्रांताधिकारी कार्यालयात सोमवारी आमदार खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत पाणीटंचाई आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीला प्रशासकीय अधिकाऱ्यासह महायुतीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

तळेगाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे काम कोल्हेवाडी फाटा येथे काही जणांकडून अडवले जात असल्याची तक्रार कार्यकर्त्यांनी केली. याची गंभीर दखल घेत आमदार खताळ यांनी प्रांताधिकारी आणि पोलीस उपाधीक्षकांना स्पष्ट निर्देश दिले की, कामात अडथळा आणणाऱ्यांवर प्रसंगी पोलीस बंदोबस्त लावा, पण हे काम येत्या ८ ते १० दिवसांत पूर्ण झालेच पाहिजे. पाण्याच्या नियोजनाअभावी घुलेवाडीतील नागरिकांना ग्रामपंचायतीवर मोर्चा काढावा लागला, याबद्दल त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

ग्रामपंचायत कार्यालयात बसून राहण्यापेक्षा प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन पाणीपुरवठ्याची पाहणी करा आणि सर्वांना सम प्रमाणात पाणी कसे मिळेल याचे चोख नियोजन करा, अशा शब्दांत त्यांनी अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. यावर उपाययोजना म्हणून मालपाणी उद्योग समूह इरिगेशन भागातील तळे व प्रवरा नदीवरील विहीर अधिग्रहित करण्यात आल्याची माहिती ग्रामपंचायत प्रशासनाकडून देण्यात आली.

आ. खताळ यांनी जलजीवन मिशनच्या कामातील दिरंगाईवर तीव्र संशय व्यक्त करताना अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पालकमंत्र्यांनी आणि मी स्वतः वारंवार आढावा घेऊनही कामे अद्याप अपूर्ण का? अधिकारी केवळ कागदावर काम पूर्ण असल्याचे सांगून कंत्राटदारांना पाठीशी घालत आहेत का? असा सवाल त्यांनी केला.

दरम्यान या योजनेची सत्य परिस्थिती तपासण्यासाठी येत्या १५ दिवसांत मी स्वतः महायुतीच्या कार्यकर्त्यांसह प्रत्येक गावात जाऊन कामांची प्रत्यक्ष पाहणी करणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेत मोठे बदल, रुग्णांना मोठा दिलासा



मुंबई (वृत्तसंस्था)

मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षासाठी अद्ययावत ऑनलाईन प्रणाली सुरू करण्यात येणार असून, या नव्या प्रणालीमुळे वैद्यकीय मदतीसाठी अर्ज मंजुरीची प्रक्रिया अवघ्या ८ तासांत पूर्ण होणार आहे. यामुळे रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या प्रणालीचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

नव्या व्यवस्थेनुसार रुग्णाला स्वतंत्रपणे अर्ज करण्याची गरज राहणार नाही. संबंधित रुग्णालयच रुग्णाची कागदपत्रे तपासून अर्ज थेट मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे पाठवणार आहे. त्यामुळे प्रक्रिया अधिक सोपी आणि जलद होणार आहे. रुग्णालयात आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर पुढील सर्व प्रक्रिया प्रशासनाच्या माध्यमातून पार पडणार असल्याने रुग्ण आणि नातेवाईकांची धावपळ कमी होईल.

नव्या ऑनलाईन प्रणालीमुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया वेगवान होणार आहे. सर्व कागदपत्रे पूर्ण आणि नियमांनुसार असल्यास केवळ ८ तासांत मंजुरी दिली जाणार आहे. यामुळे गंभीर रुग्णांना तातडीने आर्थिक मदत मिळून उपचारांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शिवाय, मदत कक्षामध्ये रुग्णस्नेही बदल करण्यात आले असून संपूर्ण प्रक्रिया डिजिटल करण्यात आली आहे. यामुळे पारदर्शकता वाढेल आणि विलंब टाळता येईल. रुग्णालय प्रशासन, मदत कक्ष आणि शासन यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी होणार असल्याने सेवा अधिक सक्षम होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाल्यानंतर ही प्रणाली संपूर्ण राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी नागरिकांना १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. नवीन ऑनलाईन प्रणालीमुळे वैद्यकीय मदत मिळवण्याची प्रक्रिया अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक होणार आहे. त्यामुळे गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळून त्यांच्या अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहेत.

# ढाकणे कॉलेजच्या ५५ विद्यार्थ्यांची अंबर इंडस्ट्रीजमध्ये निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)

शेवगांव- शेवगाव तालुक्यातील राक्षी येथील ढाकणे शैक्षणिक संकुल अंतर्गत कार्यरत समाजभूषण एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या तृतीय वर्ष मॅकेनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा विभागासाठी आयोजित कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये अंबर एंटरप्रायझेस इंडिया लिमिटेड या नामांकित कंपनीत तब्बल ५५ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या यशामुळे महाविद्यालयासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ही प्लेसमेंट प्रक्रिया अत्यंत स्पर्धात्मक वातावरणात पार पडली. लेखी परीक्षा, तांत्रिक मुलाखत तसेच वैयक्तिक मुलाखत अशा विविध टप्प्यांमधून विद्यार्थ्यांची

कसून निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या तांत्रिक ज्ञानासोबत आत्मविश्वास व प्रभावी संवाद कौशल्यांच्या बळावर उत्कृष्ट कामगिरी करत हे यश संपादन केले. महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षण उपक्रमांचा विद्यार्थ्यांना मोठा फायदा झाला. मॉक इंटरव्ह्यू, ग्रुप डिस्कशन, तांत्रिक कार्यशाळा तसेच सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षण यामुळे विद्यार्थ्यांची उद्योगाभिमुख तयारी अधिक सक्षम झाली. प्लेसमेंट सेलच्या नियोजनबद्ध आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच हे यश शक्य झाल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या प्लेसमेंट प्रक्रियेवेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एकनाथ ढाकणे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर महेश मरकड, उपप्राचार्य प्रा. प्रवीण नागरगोजे, विभागप्रमुख विश्वास घुटे, प्रा. कृष्णा ढाकणे, प्रा. बाळासाहेब शिरसाट, प्रो. किशोर बटुळे, प्रा. सचिन म्हस्के, प्रा. आकाश डमरे आदी उपस्थित होते. तसेच कंपनीकडून रूपेश वाघ, सुमित फुके, अशोक गाडीलकर आणि अनिल मोरे हे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे कौतुक करत उद्योग क्षेत्रातील संधी व अपेक्षांबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एकनाथ ढाकणे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण व सक्षम मार्गदर्शन मिळाल्यास तेही उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवू शकतात. संस्थेच्या वतीने निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# माजी मंत्री प्राजक्त तनपुरे भाजपासोबतच

## डॉ. सुजय विखेंचे खळबळजनक वक्तव्य



युवावार्ता (प्रतिनिधी) अहिल्यानगर -

विधानसभा पोटनिवडणुकीतून माघार घेतलेले राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे आता अप्रत्यक्षपणे भाजपा सोबतच आहेत, असे खळबळजनक वक्तव्य सुजय विखे यांनी केले आहे. भाजप उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारार्थ आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. दरम्यान, प्राजक्त तनपुरे यांनी पोटनिवडणुकीतून माघार घेतल्यानंतर भाजप प्रवेशाच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. तनपुरेंनी हे वृत्त फेटाळून लावले होते. पण आता विखेंच्या वक्तव्याने पुन्हा चर्चेला उधाण आले आहे.

सुजय विखे म्हणाले की, पूर्वी माझ्या कारखान्याची ऊसतोड एखाद्या शेतात गेली, तर ती तनपुरे गटाची की विखे गटाची, अशी चर्चा व्हायची. मात्र, आता मी सर्व परिस्थिती व्यवस्थित हाताळली आहे. कोणत्याही बांधावर गेलात तरी आता फक्त 'कमळ'च दिसेल. स्वतःचा त्रास कमी करण्यासाठीच आपण ही व्यूहरचना केल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# प्रतिभा चाकणकर शिर्डी पोलिसांना शरण

युवावार्ता (प्रतिनिधी)-

शिर्डी - भोंदू अशोक खरात प्रकरणी प्रतिभा चाकणकर शिर्डी पोलिस ठाण्यात हजर झाल्याची माहिती समोर आली आहे. प्रतिभा चाकणकर या रुपाली चाकणकर यांची बहीण असून, त्यांच्यावर देखील गुन्हा दाखल झालेला होता. अशोक खरातने जी खाती वापरली, त्या खात्यांमध्ये प्रतिभा चाकणकर यांच्यासह त्यांच्या मुलांच्या खात्यांचा सुद्धा समावेश होता. या सगळ्या पार्श्वभूमीवर आता त्यांची चौकशी होणार आहे.



रुपाली चाकणकर यांची बहीण प्रतिभा चाकणकर यांना शिर्डी पोलिस ठाण्याने चार दिवसांपूर्वी नोटीस बजावली होती. समता पतसंस्थेतील संशयास्पद आर्थिक व्यवहारांप्रकरणी त्यांची चौकशी केली जाणार आहे. प्रतिभा चाकणकर आणि त्यांच्या मुलांच्या नावे असलेल्या एकूण चार बँक खात्यांमधून तब्बल २ कोटी ४० लाख रुपयांचे व्यवहार झाल्याची माहिती तपास यंत्रणांच्या हाती लागली असून, या मोठ्या रकमेच्या स्त्रोताबाबत आणि व्यवहारांच्या स्वरूपाबाबत आता पोलिस सखोल तपास करणार आहेत.

अशोक खरात हा समता पतसंस्थेतील १०० खात्यांवर, तर सिन्नर येथील जगदंब पतसंस्थेतील ३२ खात्यांवर नॉमिनी असल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती. यापैकी सिन्नरमधील खात्यांची चौकशी नाशिक ग्रामीण पोलिस करत असून, समता पतसंस्थेतील व्यवहारांचा तपास शिर्डी पोलिसांकडून सुरू आहे. याच तपासाच्या साखळीचा भाग म्हणून आता प्रतिभा चाकणकर यांची चौकशी केली जाणार आहे.

अशोक खरातने या पतसंस्थेच्या माध्यमातून आपला काळा पैसा पांढरा केल्याचा संशय आहे. कारण, समता पतसंस्थेत खरात नॉमिनी असलेले १०० हून अधिक खाती आढळले आहेत. ही खाती ५७ वेगवेगळ्या लोकांच्या नावे आहेत. त्यावरून ६० कोटींहून अधिकचा व्यवहार झाला आहे. या प्रकरणी आतापर्यंत ३३ खातेदारांची चौकशी पूर्ण झाली आहे. यापैकी बहुतांश लोकांना या पतसंस्थेत आपले खाते असल्याचेच माहिती नाही, असा जबाब दिला आहे. आता प्रतिभा चाकणकर यांच्या चौकशीअंती काय माहिती समोर येते, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

अशोक खरातशी असणाऱ्या कथित संबंधांवरून रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. त्यानंतर त्यांना सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीच्या अध्यक्षपदावरही पाणी सोडावे लागले आहे. खरात प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाने या प्रकरणी रुपाली चाकणकर यांना समन्स बजावल्याची माहिती आहे. पण त्याची पुष्टी होऊ शकली नाही. तूर्त, सध्याचा घटनाक्रम पाहता त्यांचा पाय आणखी खोलात जाण्याची शक्यता आहे. राहाता, शिर्डीमधील दोन पतसंस्थांमध्ये ईडीने चौकशी केली. या पतसंस्थांमध्ये प्रतिभा चाकणकर यांच्या खात्यावरून काही कोटी रूपयांचा व्यवहार झाला आहे. मात्र आता चाकणकर यांनी या व्यवहाराशी आपला कोणताही संबंध नाही अशी भुमिका घेतली आहे.


रजि.नं.-ANR/SNR/RSR(CR) 826 / 93-94 दि.०३/०४/१९९३

**राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर**

नवीन नगर रोड, ओंकारनाथ मालपाणी मार्ग, राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज चौक, विद्यानगर, संगमनेर, ता. संगमनेर, जि.अ.नगर फोन नं. (०२४२५) २२३२२१

**सोने तारण थकबाकीदारांना जाहिर लिलाव नोटिस**

खाली नमुद केलेल्या सोने तारण कर्जदारांनी पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाची व व्याजाची वेळेवर परतफेड न केल्याने कर्ज रक्कम थकबाकी झालेली आहे. कर्जाच्या वसुलीकरिता संबंधीत कर्जदारांना वारंवार लेखी नोटिस देवून त्यास प्रतिसाद न दिल्याने संस्थेने दागिन्यांचा लिलाव करण्याचे निश्चित केलेले आहे. तरी सर्व सोने तारण थकबाकीदारांना कळविण्यात येते की, आपण आपले दागिने दिनांक २१/०४/२०२६ पर्यंत दुपारी २.०० वाजेपर्यंत व्याजासह मुद्दल भरुन सोडवून घ्यावेत. अन्यथा आपल्या दागिन्यांचा जाहीर लिलाव दिनांक २२/०४/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता संस्थेच्या कार्यालयात संस्थेच्या अटी व शर्ती यांना अधिन राहुन करण्यात येईल. लिलावाद्वारे प्राप्त झालेली रक्कम संबंधीत कर्ज खात्यात जमा केली जाईल. परंतु सोने विक्री करुनही कर्ज रक्कम, व्याज व इतर - खर्च वसूल न झाल्यास बाकी येणे रक्कमेसाठी कर्जदारांच्या विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० मधील कलम १०१ अथवा ९१ अन्यये दावा दाखल केला जाईल व उर्वरीत कर्जाची वसूली केली जाईल, याची नोंद घ्यावी. त्यासाठी होणारे खर्चास व परिणामांस कर्जदार जबाबदार राहतील. तरी इच्छुकांनी वरील पत्त्यावर उपस्थित रहावे.

| अ.क्र. | खाते क्रमांक | कर्जदाराचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| १ | १०६४७ | श्री. शिंदे संजय वामन | संजय गांधी नगर, संगमनेर, जि. अहिल्यानगर |

**लिलावात भाग घेणाऱ्यांना सूचना–**

१. इच्छुक खरेदीदारांनी (के.वाय.सी नियमाप्रमाणे) स्वतःचे ओळखपत्र व निवासाचा पुरावा घेवून येणे आवश्यक आहे.

२. सोने विक्रीसाठी लिलावधारकांचे बिड रक्कम अंतिम झाल्यास ४८ तासात पैशांचा भरणा संबधीत कर्ज खात्यावर करावा लागेल.

३. लिलावाच्या अटी व शर्ती बँकेत / पतसंस्थेत पहावयास मिळतील व त्या लिलावधारकांवर बंधनकारक राहतील.

४. लिलाव करण्याचे अथवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार बँक/ अधिकृत अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत. त्या संदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोणतेही स्पष्टीकरण दिले जाणार नाही.

सही/-

**व्यवस्थापक**

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या., संगमनेर ता. संगमनेर, जि. अ.नगर

दि. १३/०४/२०२६ (शिक्का)

# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या १३५ वी जयंती निमित्ताने...

बाबासाहेबांच्या आजोबांचे नाव मालोजी सपकाळ. त्याकाळी ते सैन्यात होते. मालोजींच्या मुळे रामजी सपकाळ (डॉ. आंबेडकरांचे) वडील, त्यांना सैनिकी शाळेमध्ये चांगले शिक्षण मिळाले. ते सुद्धा पुढे सैन्यामध्ये नोकरी करू लागले. सैन्यामध्ये सुभेदार मेजर असलेल्या धर्मा मुरबाडकर यांचा परिचय रामजी सपकाळ यांच्यासोबत झाल्यानंतर त्यांनी आपल्या मुलीचे, भीमाबाईचे लग्न रामजी सपकाळ यांच्यासोबत करून दिले.

बाबासाहेबांचा जन्म सुभेदार रामजी सपकाळ सैन्यामध्ये कार्यरत असताना महू येथे १४ एप्रिल १८९१ ला झाला. बाबासाहेब सहा वर्षाचे असताना त्यांच्या आई-भिमाबाई यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांचे संगोपन आत्या मीराबाई यांनी केले. रामजी सपकाळ निवृत्तीनंतर आपल्या मूळ गावी, दापोली मधील अंबावडे या ठिकाणी स्थायिक झाले. त्याकाळी गावच्या नावावरून आडनावे लावत असे (शेवटी नावात 'कर' जोडत असे). त्यावरून रामजींनी त्यांच्या आडनाव 'सपकाळ' वरून 'आंबावडेकर' असे ठेवले. पुढे शिक्षणासाठी रामजी साताऱ्यांमध्ये आले. बाबासाहेबांना सरकारी सैनिकी शाळेत दाखल केले. त्यावेळी तेथील शिक्षक आंबेडकर यांनी बाबासाहेबांची हुशारी व शिकण्याची जिद्द पाहिली, व त्यांनी त्यांचे 'आंबेडकर' हे आडनाव बाबासाहेबांना दिले. खडतर प्रयत्नानंतर, असंख्य हालअपेष्टा सहन करून बाबासाहेब मॅट्रिक झाले. वयाच्या १७ व्या वर्षी त्यांचा रमाबाई यांच्याशी विवाह झाला. पुढे मुंबईला एलिफंट कॉलेजमध्ये शिकत असताना कर्मवीर विठ्ठल राम शिवराम कांबळे अशा दलित चळवळीतील कार्यकर्त्यांशी त्यांचा संपर्क आला.

१९१२ मध्ये साहेब बी.ए. आर्ट्स उत्तीर्ण झाले. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही.

डॉ. बाबासाहेब भारतातील उच्च विद्या भूषित जे होते, त्यापैकी सर्वाधिक पदव्या संपादन करणारा एकमेव होते. त्यांनी बी.ए., एम.ए., पी.एच.डी., एम.एससी., डी.एससी., बॅरिस्टर कोलंबिया, लंडन, अमेरिका, जर्मनी अशा अनेक प्रदेशामधून ३२ व त्यापेक्षा जास्त पदविका संपादन केल्या. त्यांनी आठ वर्षांचा अभ्यासक्रम दोन वर्षे तीन महिन्यांत पूर्ण करून 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी मिळवली. डॉ. बाबासाहेबांचे शिक्षण हे त्यांच्या संघर्षाचे व ज्ञानप्राप्ती असलेल्या निष्ठेचे प्रतीक आहे. म्हणून त्यांना 'सिंबॉल ऑफ नॉलेज' (ज्ञानाचे प्रतीक) म्हणून ओळखले जाते.

प्रदेशातून साहेबांनी शिक्षण घेऊन आल्यानंतर सरकारी नोकरी केली नाही. बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांच्या संस्थानमार्फत बाबासाहेबांना प्रदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी स्कॉलरशिप दिली. त्यांच्या उत्तरदायित्व म्हणून डॉ. आंबेडकर यांनी १९१७ मध्ये बडोदा संस्थानात उच्च पदावर रुजू झाले. मात्र, त्यांना जातीभेदाच्या भीषण अनुभवास सामोरे जावे लागले. उच्चशिक्षित असूनही, अस्पृश्यतेमुळे त्यांना राहण्यासाठी घर मिळाले नाही. नाव बदलून पारशी धर्मशाळेमध्ये राहण्यास जागा मिळाली. परंतु, जेव्हा त्यांना समजले की बाबासाहेब अस्पृश्य आहेत, त्यांनी साहेबांना रात्री बाहेर काढले व एका बागेत त्यांनी आश्रय घेतला. तेव्हा त्यांना उमजले की, माझा समाज अजून किती जातीभेदाच्या गराड्यात अडकला आहे. जोपर्यंत माझा समाज यातून बाहेर पडत नाही, तोपर्यंत या उपेक्षित वर्गासाठी काम करायचे निश्चित करून त्यांनी बडोदा सोडले.



मुंबईला परत आल्यानंतर त्यांनी पाहिले की, हजारो वर्षांपासून शिक्षण नाकारलेल्या कनिष्ठ जातीमध्ये अज्ञान व निरक्षरता, भयानक गरिबी व जातीयता सर्वत्र पसरलेली आहे. यातून समाजाला बाहेर काढण्यासाठी त्यांनी अहोरात्र प्रयत्न केले. कनिष्ठ जातींना त्यांच्या दोन्ही स्थितीचे कारण शिक्षणाचा अभाव हेच आहे, याची जाणीव डॉ. बाबासाहेबांनी समाजातील प्रत्येक घटकांना करून दिली.

समाजातील सर्व घटकांनी शिक्षण घेतले पाहिजे. त्याकरिता कनिष्ठ वर्गातील लोकांनी त्यांच्या मुलांना शाळेत पाठवावे, यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले. या मुलांना शिष्यवृत्ती, गणवेश, भोजन व निवारा अशा सुविधा पुरविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या अनुयायांना शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा असा संदेश दिला. १९२८ मध्ये मुंबईच्या गव्हर्नरला सांगून मुंबईमध्ये दलित विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह व शाळा चालू केल्या. १९४५ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांना मध्यम वर्गात शिक्षण घेता यावे म्हणून 'पिपल्स एज्युकेशन सोसायटी' या शैक्षणिक संस्थेची मुंबईमध्ये स्थापना केली. सध्या देशभरात या संस्थेची ४० पेक्षा जास्त महाविद्यालये आहेत.

१९४६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढील शिक्षणाची गरज ओळखून 'पिपल्स एज्युकेशन' या संस्थेच्या वतीने मुंबईमध्ये सिद्धार्थ कला व विज्ञान महाविद्यालय स्थापन केले. याच महाविद्यालयाचे १९५३ ला 'कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स' स्थापन केले. तसेच १९५६ ला सिद्धार्थ कॉलेज ऑफ लॉ स्थापन केले. औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय सुरू केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाच्या उन्नतीसाठी, शैक्षणिक प्रगतीसाठी व समाजाला या अंधकारातून बाहेर पडण्यासाठी काही सामाजिक व धार्मिक संस्था स्थापन केल्या. त्यामध्ये बहिष्कृत हितकारणी सभा, समता सैनिक दल, भारतीय बौद्ध महासभा तसेच अनेक शैक्षणिक संस्था व राजकीय पक्षांची स्थापना केली.

स्वातंत्र्य मजूर पक्ष, शेड्युल कॉस्ट फाउंडेशन, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या माध्यमातून अखिल भारतीय दलित, वंचित बहुजन, ओबीसी, भटक्या मागासलेल्या समाजासाठी त्यांनी एकच ध्येय ठेवले- यातून समाजाला बाहेर काढणे. त्यासाठी मागासलेल्या सर्व जाती-धर्मातील जनतेला शिक्षणाशिवाय कुठलाही उपाय नाही. शिक्षण हे वाघिणीचे दूध असून, जो कोणी ते पिईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही, असा मंत्र त्यांनी दिला.

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर तथा बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय व्यासशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजनीतितज्ञ आणि समाजसुधारक व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार होय. त्यांनी बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली. अस्पृश्य, दलित, मागास घटकांच्या लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली. तसेच महिला व कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते ब्रिटिश काळात भारताचे मजूर मंत्री होते व स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री होते. त्यांनी भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन केले. १९५६ मध्ये त्यांनी आपल्या अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. धर्मांतरानंतर काही महिन्यांनी त्यांचे निधन ६ डिसेंबर १९५६ ला झाले. ३१ मार्च १९९० रोजी मरणोत्तर 'भारतरत्न' हा भारतातील सर्वोच्च नागरी सन्माननीय पुरस्कार जाहीर करण्यात आला. १४ एप्रिल १९९० रोजी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जय भीम, जय संविधान

अनिल गायकवाड.

**अनिल बंडोपंत गायकवाड,**
**अध्यक्ष राजश्री शाहू महाराज**
**सामाजिक सेवाभावी संस्था घुलेवाडी**

# भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर : आधुनिक भारताचे आधारस्तंभ



• भारतरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांची जयंती म्हणजे केवळ एका महान व्यक्तिमत्त्वाचा जन्मदिन नव्हे, तर समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय यांच्या विचारांचा उत्सव आहे. १४ एप्रिल हा दिवस संपूर्ण भारतात आणि जगभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी आपण त्या महामानवाच्या कार्याचे स्मरण करतो, ज्यांनी आपल्या बुद्धिमत्ता, परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर समाजातील असमानतेविरुद्ध लढा देत एक नवा इतिहास घडवला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू येथे झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांचे बालपण गेले. समाजातील जातीय भेदभावामुळे त्यांना अनेक अपमान आणि अडचणींचा सामना करावा लागला. शाळेत पाणी पिण्यापासून ते बसण्यापर्यंत अनेक मूलभूत गोष्टींसाठीही त्यांना संघर्ष करावा लागला. मात्र, या सर्व अडचणींना न जुमानता त्यांनी शिक्षणाची कास धरली आणि आपल्या जिद्दीने जगाला दाखवून दिले की, परिस्थिती कितीही कठीण असली तरी ज्ञानाच्या जोरावर यश मिळवता येते.

डॉ. आंबेडकर हे अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी होते. त्यांनी मुंबई विद्यापीठातून पदवी प्राप्त केली आणि त्यानंतर परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेतले. त्यांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे शिक्षण घेऊन अर्थशास्त्र, कायदा आणि राजकारण या विषयांत प्राविण्य मिळवले. त्या काळात परदेशात जाऊन शिक्षण घेणे ही मोठी गोष्ट होती, आणि त्यांनी ते यशस्वीपणे पूर्ण करून भारताचे नाव उज्ज्वल केले.

भारतामध्ये परतल्यानंतर त्यांनी समाजातील वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांसाठी काम करण्यास सुरुवात केली. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी अनेक चळवळी उभारल्या. महाड येथे त्यांनी केलेला महाड चवदार तळे सत्याग्रह हा ऐतिहासिक लढा, सामाजिक समतेच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा ठरला. या सत्याग्रहातून त्यांनी अस्पृश्य समाजालाही पाण्याचा हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांनी नाशिक येथे काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन उभारून धार्मिक स्थळांवरही समान हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या संघर्षामुळे समाजात जागृती निर्माण झाली आणि लोकांमध्ये समतेची भावना बळकट झाली.

डॉ. आंबेडकर यांनी केवळ सामाजिकच नव्हे, तर राजकीय क्षेत्रातही मोठे योगदान दिले. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय सहभाग घेतला आणि वंचित समाजाच्या हक्कांसाठी आवाज उठवला. त्यांच्या दूरदृष्टीमुळे त्यांना स्वतंत्र भारताच्या संविधान मसुदा समितीचे अध्यक्षपद मिळाले. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताला एक मजबूत, सर्वसमावेशक आणि लोकशाही मूल्यांवर आधारित भारतीय राज्यघटना प्राप्त झाली. भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना मानली जाते. यात प्रत्येक नागरिकाला समान हक्क, स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी देण्यात आली आहे. जाती, धर्म, लिंग किंवा भाषा यावर आधारित भेदभाव न करता सर्वांना समान वागणूक देण्याचा मूलभूत अधिकार या राज्यघटनेत दिला आहे. हे सर्व डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे फलित आहे.

डॉ. आंबेडकर यांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची शिक्षणावरील नितांत श्रद्धा. त्यांनी समाजाला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश दिला. त्यांच्या मते, शिक्षण हेच खरे स्वातंत्र्य मिळवण्याचे साधन आहे. त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था स्थापन केल्या आणि समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षण घेण्यासाठी प्रेरित केले. त्यांचे विचार केवळ भारतापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी मानवतेचा विचार केला आणि सर्वांसाठी समानतेचा संदेश दिला. त्यांनी स्त्रियांच्या हक्कांसाठीही मोठे काम केले. स्त्रियांना समान हक्क मिळावेत, त्यांना शिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळाव्यात, यासाठी त्यांनी कायद्यामध्ये अनेक सुधारणा केल्या. डॉ. आंबेडकर यांनी धर्माच्या बाबतीतही स्वतंत्र विचार मांडले. त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून समाजाला समानता, करुणा आणि शांततेचा मार्ग दाखवला. त्यांच्या या निर्णयामुळे लाखो लोकांनी नवजीवनाची दिशा मिळवली. त्यांच्या मते, धर्म हा मानवाच्या उन्नतीसाठी असावा, भेदभाव निर्माण करण्यासाठी नव्हे.

आजच्या आधुनिक भारतातही डॉ. आंबेडकर यांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षणाच्या युगात आपण प्रगती करत असलो, तरी सामाजिक समता आणि न्याय या मूल्यांचे पालन करणे तितकेच आवश्यक आहे. त्यांच्या विचारांवर चालूनच आपण एक मजबूत आणि प्रगत भारत निर्माण करू शकतो. डॉ. आंबेडकर यांचे जीवन हे संघर्ष, जिद्द आणि यश यांचे उत्तम उदाहरण आहे. त्यांनी आपल्या कठोर परिश्रमाने आणि बुद्धिमत्तेने समाजात एक मोठा बदल घडवून आणला. त्यांच्या कार्यामुळेच आज भारत एक लोकशाही राष्ट्र म्हणून उभा आहे.

आजच्या या पवित्र दिवशी आपण सर्वांनी त्यांच्या विचारांचे अनुसरण करण्याची प्रतिज्ञा करावी. समाजात समता, बंधुत्व आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावा. जातीय भेदभाव, अन्याय आणि अज्ञान यांचा नाश करून एक सशक्त आणि एकात्म भारत निर्माण करणे हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कार्य हे सदैव प्रेरणादायी राहतील. त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या आदर्शांवर चालण्याचा निर्धार करूया.

शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, - डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

**शिवाजी दुशिंग सर,**
**– मा. अध्यक्ष संगमनेर तालुका प्राथमिक शिक्षक मंडळ**
**– मा. राज्य कार्यालयीन चिटणीस, महा. राज्य प्राथमिक शिक्षक समिती**

# संघर्षातून उभा राहिलेला महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर

भारतीय समाजरचनेत आमूलाग्र बदल घडवून आणणारे, सामाजिक न्यायाचे प्रखर पुरस्कर्ते आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन हे संघर्ष, शिक्षण आणि परिवर्तनाची प्रेरणादायी गाथा आहे. त्यांच्या कार्यामुळे वंचित घटकांना नवे भान मिळाले आणि समानतेचा मार्ग अधिक दृढ झाला.

रत्नागिरी जिल्हात मंडणगडाजवळ असलेले आंबडवे हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे वडील रामजी सकपाळ हे लष्करात सुभेदार मेजर होते. ते महू येथे असताना आंबेडकरांचा जन्म झाला. आंबेडकर सहा वर्षांचे असतानाच त्यांची आई भीमाबाई मरण पावली. आंबेडकरांचे पुढील सर्व पालनपोषण रामजी व त्यांची बहीण मीराबाई ह्यांनी केले. रामजी लष्करातून निवृत्त झाल्यावर कुटुंबासह नोकरीसाठी साताऱ्यास आले. त्यामुळे आंबेडकरांचे प्राथमिक शिक्षण साताऱ्यास झाले.

आंबेडकरांचे माध्यमिक व विश्वविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कूल व कॉलेजमध्ये झाले. या काळात दोन महत्त्वपूर्ण घटना त्यांच्या जीवनात घडल्या. एक म्हणजे त्यांचे रमाबाई ह्या स्वजातीय, म्हणजे महार जातीच्या, मुलीशी लग्न झाले व दुसरी त्यांचे जीवन प्रभावी होण्यास साह्यभूत झालेल्या केळुसकर गुरूजींशी त्यांचा निकटचा संबंध आला. पदवी घेतल्यानंतर त्यांना बडोदे संस्थानची शिष्यवृत्ती मिळाली व १९१३ मध्ये ते उच्च शिक्षणासाठी अमेरिकेस गेले. तेथील कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी अर्थशास्त्र विषयात एम.ए. व पीएच. डी. ह्या पदव्या मिळविल्या.

भारतात परत आल्यानंतर त्यांनी बडोदे संस्थानची नोकरी धरली. बडोदे येथील वास्तव्यात त्यांना अस्पृश्य म्हणून जे अत्यंत कटू अनुभव आले, त्यामुळे त्यांनी ती नोकरी सोडली व मुंबईस येऊन सिडनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी पतकरली. तोपर्यंत अस्पृश्य म्हणून पदोपदी त्यांची जी मानखंडना झाली, तिचा परिणाम त्यांच्या मनावर फार झाला. अस्पृश्यांमध्ये जागृती निर्माण करण्याकरिता त्यांनी अस्पृश्य वर्गातील कार्यकर्त्यांची संघटना उभारण्यास सुरूवात केली मुंबई येथे ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक नावाचे पाक्षिक काढले कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्यांची त्याच संस्थानातील माणगाव येथे त्याच वर्षी परिषद घेतली व स्पृश्य-अस्पृश्यांच्या सहभोजनांचे कार्यक्रम घडवून आणले. नागपूर येथे मे १९२० मध्ये छत्रपती शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली एक अखिल भारतीय परिषद त्यांनी बोलावली. अस्पृश्यांचे प्रतिनिधी विधिमंडळाने नेमावेत. या महर्षी शिंद्यांच्या 'डिप्रेस्ड क्लास मिशन' च्या धोरणाचा या परिषदेत निषेध करण्यात आला. त्यांनी हाती घेतलेल्या ह्या प्राथमिक कार्यातच त्यांचे नेतृत्वाचे गुण दिसून आले.

हे लोकजागृतीचे कार्य चालू असताना, स्वत:चे अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याकरिता, ते मुख्यत: आपले स्नेही नवल भंथेना आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या मदतीने इंग्लंडला गेले. त्यांनी लंडन विद्यापीठाची डी. एससी . ही दुर्लभ पदवी १९२३ साली संपादन केली. ते बॅरिस्टरही झाले. मायदेशी परतताच मुंबईस त्यांनी वकिली सुरू केली. सरकारी विधि-महाविद्यालयात त्यांनी काही काळ प्राध्यापकाचे व प्राचार्याचेही काम केले. तथापि अस्पृश्यांच्या हिताचे कार्य त्यांनी चालूच ठेवले. १९२४ मध्ये त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी' ही संस्था स्थापन केली. शिकवा चेतवा व संघटित करा हे या संस्थेचे ब्रीदवाक्य होते. १९२६ साली सातारा जिल्ह्यातील रहिमतपूरला भरलेल्या महार-परिषदेत त्यांनी अस्पृश्य बंधूंना वतनदारी व गावकीचे हक्क सोडून देण्याचा संदेश दिला. त्यामुळे शेकडो महारांनी गावकीची कामे सोडून इतर कामे करण्यास सुरुवात केली. १९२७ मध्ये कुलाबा जिल्ह्यातील महाडच्या चवदार तळ्यावर अस्पृश्यांना इतरांप्रमाणे पाणी भरता यावे, म्हणून त्यांनी आपल्या हजारो अनुयायांसह सत्याग्रह केला व अस्पृश्यतेचा पुरस्कार करणारी मनुस्मृति जाळली. त्यांच्या काही अनुयायांसह त्यांच्यावर सनातन्यांनी खटला भरला. खटला जिद्दीने लढवून त्यांनी स्वत:ची व आपल्या सहकाऱ्यांची निर्दोष सुटका करून घेऊन चवदार तळ्यावर पाणी भरण्याचा अस्पृश्यांचा हक्क प्रस्थापित केला. १९२८ साली भारतात आलेल्या सायमन आयोगावर इतरांनी बहिष्कार घातला होता. पण अस्पृश्य बंधूचे हित लक्षात घेऊन आंबेडकरांनी मात्र त्या मंडळासमोर आपली साक्ष नोंदवून, अस्पृश्य लोकांकरिता सरकारने काय करावयास पाहिजे, हे सांगितले. अस्पृश्यांना इतरांप्रमाणे देवाचे दर्शन घेता यावे, म्हणून त्यांनी आपल्या अनुयायांसह १९३० साली नासिक येथे काळराममंदिर-प्रवेशासाठी सत्याग्रह केला. त्यात त्यांना व त्यांच्या अनुयायांना मार खावा लागला, पण पूर्वीच्याच जिद्दीने त्यांचे कार्य चालू राहिले. त्यांनी बहिष्कृत भारत, जनता, समता, इ.वर्तमानपत्रांद्वारे त्याचप्रमाणे बहिष्कृत हितकारिणी व इतर संस्थाद्वारे अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाविरूध्द आवाज उठविला व त्यांच्यात आत्मविश्वास, अन्यायाविरूध्द लढण्याची जिद्द, वाईट चालीरीती सोडून देण्याची प्रवृत्ती, शिक्षणाची व स्वच्छतेची आवड निर्माण करून त्यांचा स्वाभिमान जागृत केला.

आंबेडकर १९३० मध्ये ~ गोलमेज परिषदांसाठी इंग्लंडला गेले. तिन्ही परिषदांना ते उपस्थित राहिले. तेथे त्यांनी अस्पृश्यांची बाजू मांडली आणि अस्पृश्यांच्या इतर हक्काबरोबर स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली व ती पंतप्रधान मॅक्डॉनल्ड ह्यांनी मंजूरही केली. त्यातूनच गांधी व आंबेडकर ह्यांच्यात मतभेद निर्माण झाले.

त्यांनी स्वतंत्र मजूरपक्षाची स्थापना केली (१९३६). ते प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुकीत प्रचंड मतांनी निवडून आले. १९३९ साली येऊ घातलेल्या संघराज्य पध्दतीला त्यांनी विरोध केला व दारुबंदीच्या धोरणावर टीका केली, १९४२ साली त्यांनी 'ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशन' नावाचा एक देशव्यापी पक्ष स्थापन केला. या पक्षातर्फे अस्पृश्यांकरिता त्यांनी अनेक लढे दिले. १९४२ पासून १९४६ पर्यंत ते व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळात मजूरमंत्री होते. या काळात त्यांनी अस्पृश्यांची शैक्षणिक व आर्थिक उन्नती करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' स्थापन केली व मुंबईस सिध्दार्थ महाविद्यालय सुरू केले. ह्याच संस्थेने पुढे औरंगाबादला मिलिंद महाविद्यालय स्थापिले. भारत स्वतंत्र झाल्यावर ते केंद्रीय मंत्रिमंडळात विधिमंत्री म्हणून आले. स्वतंत्र भारताच्या संविधानसमितीचे ते सभासद झाले. पुढे ते संविधान-लेखन-समितीचे अध्यक्षही झाले. अस्पृश्यता नामशेष



करणारा संविधानातील ११ वा अनुच्छेद हा आंबेडकरांचा विजयच आहे. सतत परिश्रम घेऊन, चर्चा करून त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने सु. तीन वर्षांत संविधानाचा मसुदा तयार केला. ह्या महत्त्वाच्या कामगिरीबरोबरच त्यांनी 'हिंदु कोड बिल' लोकसभेला सादर करण्याचा बहुमान मिळविला.

डॉ. शारदा कबीर ह्या सारस्वत महिलेशी १५ एप्रिल १९४८ रोजी त्यांनी दुसरा विवाह केला. ह्या सुमारास त्यांचे नेहरूंशी व काँग्रेस धोरणाशी फारसे पटेना. म्हणून मंत्रिपदाचा त्यांनी राजीनामा दिला. हिंदुधर्म जातिसंस्थेमुळे पोखरला गेला आहे, अशी त्यांची ठाम समजूत होती. स्पृश्यांकडून अस्पृश्यांवर होत असलेला अन्याय धर्मांतरावाचून दूर होणार नाही, या त्यांच्या दृढ श्रध्देनुसार त्यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे मोठ्या समारंभाने अनेक अनुयायांसह बौध्द धर्म स्वीकारला. यानंतर त्यांनी बौध्द धर्माच्या प्रसाराचे कार्य हाती घेतले. त्यांच्या मनात 'रिपब्लिकन पक्ष' स्थापन करावयाचा होता, परंतु तो त्यांच्या हयातीत स्थापन झाला नाही.

धर्म आणि जातिसंस्था यांसंबंधी डॉ. आंबेडकरांचे विचार क्रांतिकारक होते. १९३६ साली लाहोर येथील जातपात-तोडक मंडळाच्या वार्षिक संमेलनातील अध्यक्षीय भाषण नाय्हिलेशन ऑफ कास्ट्स (१९३७) या पुस्तकात त्यांनी प्रसिध्द केले. जातिव्यवस्था ही श्रमिकांच्या अनैसर्गिक विभागणीस व हिंदू समाजाच्या ऐतिहासिक पराभवास, नैतिक अधोगतीस तसेच त्याच्या दुबळेपणास कारणीभूत आहे जातिव्यवस्थेचा मुख्य आधार म्हणजे हिंदूचा धर्मभोळेपणा असून तो नष्ट करून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांच्या तात्विक अधिष्ठानावर हिंदू समाजाची पुनर्घटना करावी यासारखी प्रेरक विचारसरणी आंबेडकरानी प्रस्तुत पुस्तकात मांडली आहे. व्हॉट काँग्रेस अँड गांधी हॅव डन टू द अन्टचेबल्स (१९४५) या ग्रंथात त्यांनी काँग्रेसच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्यक्रमाच्या मर्यादा आणि अपयश यांची चर्चा केली आहे. आंबेडकरांच्या व्यासंगाचे व संशोधनकुशलतेचे प्रतीक असलेला ग्रंथ म्हणजे हू वेअर द शूद्राज ?(१९४६) हा होय. विद्यमान शूद्र म्हणजे पूर्वकालीन क्षत्रिय होत. ब्राम्हणांशी संघर्ष झाल्यामुळे त्यांना शूद्रत्व प्राप्त झाले, असा निष्कर्ष त्यांनी या ग्रंथात काढला आहे. द अन्टचेबल्स (१९४८) या नावाचे त्यांचे पुस्तकही या संदर्भात उल्लेखनीय आहे. बुध्द अँड हिज धम्म हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ त्यांच्या मरणोत्तर प्रसिध्द झाला (१९५७). धर्माच्या रूढ कल्पनांहून बौध्द धर्माची कल्पना वेगळी असून ती समाजाच्या पुनर्रचनेशी अधिक निगडित आहे. त्यामुळे सामाजिक व नैतिक मूल्ये हेच बौध्द धर्माचे खरे अधिष्ठान आहे. लो. टिळकांच्या गीतारहस्याप्रमाणे आंबेडकरांनी बौध्द धर्माचे कालोचित रहस्य या भाष्यग्रंथात विशद केले. श्रेष्ठ कायदेपंडित व अस्पृश्यांचा तडफदार नेता म्हणून आंबेडकरांची स्मृती चिरंतन राहील.

**संकलन**
**आकाश गोडगे,**
**संस्थापक अध्यक्ष – ब्लू पँथर ग्रुप संगमनेर**

पॅनल देणे आहे



दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता



पॅनल देणे आहे





नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................. 05
सेल्सगर्ल................... 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर........................ 03
We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर


# तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे काम अंतिम टप्प्यात, १६ गावांना लवकरच शुद्ध पाणीपुरवठा



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- संगमनेर तालुक्यातील निंबाळे शिवारात प्रवरा नदीवरून कोल्हेवाडी फाटा मार्गे वडगावपान साठवण तलावात पाणी सोडण्यासाठी सुरू असलेल्या पाईपलाईन जोडणीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. काही काळ कोल्हेवाडी फाटा येथे अडथळ्यांमुळे काम मंदावले होते. मात्र, हा अडथळा दूर करण्यात आल्याने सध्या काम युद्धपातळीवर सुरू असून, पुढील १० ते १५ दिवसांत तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत १६ गावांना शुद्ध पाणीपुरवठा सुरू होणार आहे.

तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या अंमलबजावणीत कोल्हेवाडी फाटा येथे अडथळे निर्माण झाले होते. हे अडथळे दूर झाल्यानंतर प्रवरा नदीतील पाणी पाईपलाईनद्वारे वडगावपान साठवण तलावात सोडण्याचे काम सुरू आहे. जलशुद्धीकरण प्रकल्पाद्वारे हे पाणी शुद्ध करून तळेगावसह १६ गावांना जलजीवन मिशनच्या माध्यमातून पुरवठा केला जाणार आहे. या योजनेतील जलशुद्धीकरण प्रकल्पासह बहुतांश काम पूर्ण झाले असून, उर्वरित पाईपलाईन जोडणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. हे काम येत्या १० ते १५ दिवसांत पूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान, या योजनेच्या व्यवस्थापन आणि अंमलबजावणीबाबत काही आरोप होत आहेत. पाणीपुरवठा योजनेचे अध्यक्ष व काही सदस्य हे काँग्रेस पक्षाचे असून, वीज बिल थकीत राहिल्याने काही वेळा वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटनाही घडल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे काही गावांना नियमित पाणीपुरवठ्यात अडचणी आल्याची स्थानिकांची तक्रार आहे. जलजीवन मिशन अंतर्गत कामे सध्या वेगाने सुरू असली, तरी त्याचे कंत्राटही काँग्रेसशी संबंधित ठेकेदाराकडे असल्याचा आरोपही महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

तळेगाव दिघे गावासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा व्यवस्था उभी करण्यात आली आहे. राज्याचे जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या माध्यमातून भागवतवाडी येथील तलावातून पाईपलाईनद्वारे पाणी उचलून ग्रामपंचायतीमार्फत तळेगावला पुरवठा सुरू करण्यात आला आहे. मात्र, या कामाचे काहीजण खोटे श्रेय घेत आहेत.

- मयूर दिघे (उपसरपंच, तळेगाव दिघे)

# प्रलंबित देयकाची तरतूद, 'बांधकाम'च्या कंत्राटदारांचे आंदोलन स्थगित



अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)- सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कंत्राटदारांनी सुरू केलेल्या कामबंद आंदोलनाला अखेर ब्रेक लागला आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या सातारा येथील निवासस्थानी झालेल्या बैठकीत कंत्राटदारांच्या प्रलंबित देयकांसह विविध मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आले. यानंतर राज्यभरातील आंदोलन मागे घेण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला आहे.

या बैठकीस सार्वजनिक बांधकाम खात्याचे सचिव शरद राजभोज यांच्यासह कंत्राटदार संघटनेचे राज्य अध्यक्ष इंजि. मिलिंद भोसले, विभागीय अध्यक्ष अनिल पाटील, इंजि. समीर शेख, सुरेश कडु, प्रकाश पांडव, प्रकाश पालरेचा, मंगेश आवळे, कांतिलाल डुबल, दिनेश कटारिया, कैलास लांडे, सिकंदर डांगे, प्रशांत भोसले, पुंजाराम पाटील, नरेंद्र भोसले आदी उपस्थित होते.

कंत्राटदारांनी ९ मार्च रोजी कर्जत येथे झालेल्या बैठकीत ३१ मार्चपर्यंत देयके न मिळाल्यास ७ एप्रिलपासून कामबंद आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानुसार ७ एप्रिलपासून कामे ठप्प करण्यात आली होती. मात्र, शासनाने तातडीने दखल घेत बैठक बोलावली आणि त्यातून मोठे निर्णय जाहीर झाले.

बैठकीत राज्यातील प्रलंबित देयकांसाठी १९ हजार कोटींच्या बजेटव्यतिरिक्त आणखी ९ हजार कोटींची अतिरिक्त तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच सध्या सुरू असलेल्या व अपूर्ण कामांना कोणत्याही अटीशिवाय मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

याशिवाय १.५ कोटींच्या आतील कामांमध्ये ३३ टक्के सुशिक्षित बेरोजगार अभियंते आणि ३४ टक्के ओपन कंत्राटदार यांना कामे देण्याचे आदेश देण्यात येणार आहेत. कंत्राटदारांच्या अडचणी व प्रश्न तत्काळ सोडवण्यासाठी संघटनांनी थेट सचिव व मंत्र्यांकडे मांडावेत, असे निर्देशही देण्यात आले असून, निधी वितरणात सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात येणार आहेत. दरम्यान, या निर्णयांमुळे कंत्राटदारांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# भोंदू खरात प्रकरणात ईडी सक्रिय, सलग छापेमारी

नाशिक (प्रतिनिधी)- भोंदू अशोक खरातच्या प्रॉपर्टीची ईडीकडून सखोल चौकशी सुरू करण्यात येत आहे. पुणे, नागपूरसह नाशिकमध्ये ११ ठिकाणी ईडीने छापेमारी केल्याची माहिती समोर आली आहे. अशोक खरातच्या ईशानेश्वर मंदिर, नाशिकचे कार्यालय आणि वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या जमिनीची ईडी अधिकाऱ्यांनी पाहणी केल्याची सूत्रांची माहिती आहे. एसआयटी अधिकाऱ्यांसोबत ईडी पथकाची संयुक्त कारवाई सुरू झाल्याची माहिती आहे.

भोंदू अशोक खरात याच्या घरीही आयकर विभागाने छापेमारी केली. भोंदू अशोक खरात प्रकरणातील आर्थिक व्यवहार, मालमत्तांसंदर्भात आयकर विभागाकडून तपास सुरू आहे. नाशिकच्या तृप्ताबाला या बंगल्यात गेल्या तासाभरापासून आयकर विभागाचे दोन पथके तपास करत आहेत.

आयकर विभाग आणि ईडीकडून संयुक्त रित्या कारवाई सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, दुसरीकडे अशोक खरात याला तिसऱ्यांदा ७ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. आज त्याला कोर्टात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने अशोक खरात याला २० एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी दिली आहे.


INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता -
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
❋ कर्ज रक्कम वाढ । ❋ कर्ज व्याजदर कमी । ❋ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता


# भारतीय बौद्ध महासभा व वंचितच्यावतीने महात्मा फुलेंना अभिवादन



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- भारतीय बौद्ध महासभा व वंचित बहुजन आघाडीच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती सिध्दार्थ वसतिगृह, संगमनेर येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे तसेच वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्व महापुरुषांच्या कार्याचा गौरव करून त्यांना अभिवादन करून त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा प्रयत्न आपण प्रत्येकाने करावा असे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले. यावेळी प्रभाकर रोकडे, विनय घोसाले, सचिन साळवे, अमोल कदम, हिरामण आहिरे, रावसाहेब पराड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.


चैतन्य हॉस्पिटल
• अतिदक्षता विभाग • किडनी विकार
• मधुमेह व हृदयरोग • मेंदू विकार व शस्त्रक्रिया
• दमा व श्वसनाचे विकार • सर्पदंश व विषबाधा
• फुफ्फुसासंबंधी औषधोपचार • बालरोग चिकित्सा विभाग
• जनरल सर्जरी • प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
• पोटाचे विकार व शस्त्रक्रिया • संधीवात व मणके विकार
आपत्कालीन औषधे व उपचार
सर्व कंपनीजच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२



अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/शुक्राणूंची कमी गुप्तरोग/त्वचारोग/नपुंसकत्व/मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13



दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605



स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिमनाय्
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25